RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com | Vidabh Kesari News | 90969 45629 | @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू

अमरावती
४ बुधवार
फेब्रुवारी २०२६
✻ वर्ष ५ ✻ अंक २५०
✻ पृष्ठ : ४ ✻ मूल्य रु : ३

मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

## अमरावती जिल्ह्यात वाघाचा मृत्यू

■ वरुड तालुक्यातील पंढरी वर्तुळामध्ये पट्टेदार वाघाचा कुजलेल्या स्थितीत मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली असून वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी मंगळवारी (ता. तीन) सकाळपासूनच घटनास्थळावर तळ ठोकून होते. या पट्टेदार वाघाचा मृत्यू नेमका कशामुळे झाला? याचा शोध घेतला जात असून वाघाच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करून त्याला अग्नी देण्यात आला. महेंद्री वनसंवर्धन क्षेत्रांतर्गत येणाऱ्या पंढरी शिवारामध्ये मंगळवारी सकाळच्या सुमारास पट्टेदार वाघाचा मृतदेह आढळून आला. वनविभागाचे कर्मचारी गस्तीवर असताना जंगलातील एका भागातून दुर्गंधी येत असल्याचे निदर्शनास येताच कर्मचाऱ्यांनी संबंधित ठिकाणी जाऊन बघितले असता जंगली प्राण्याचा मृतदेह असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्या कर्मचाऱ्यांनी वरुडचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत भुजाडे व इतर अधिकाऱ्यांना माहिती दिली.

## कारची बापलेकाला धडक; वडिलांचा मृत्यू

**▸विदर्भ केसरी। सातारा :**

पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्ग ओलांडत असताना काशीळ (ता. सातारा) येथे बापलेकाला भरधाव कारने जोरदार धडक दिली. यामध्ये गंभीर जखमी झालेल्या वडिलांचा मृत्यू झाला. हा अपघात ३१ जानेवारी रोजी सायंकाळी झाला. संतोष शंकर पवार (वय ३९, रा. म्हावशी, ता. पाटण, सध्या रा. शिवराजगनर, काशीळ, ता. सातारा) असे अपघातातमृत्यू झालेल्या वडिलांचे नाव आहे. याबाबत राज संतोष पवार (१३, रा. म्हावशी, ता. पाटण) याने बोरगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. राज व त्याचे वडील काशीळ येथे सायंकाळी सात वाजता महामार्ग ओलांडत होते. त्यावेळी कराड बाजूकडून भरधाव आलेल्या पांढऱ्या रंगाच्या कारने (एमएच. १२, एफयू. ७३९९) दोघांनाही जोरदार धडक दिली. यामध्ये दोघेही गंभीर जखमी झाले. दोघांनाही तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वडील संतोष पवार यांचा उपचारादरम्यान रुग्णालयात मृत्यू झाला.

## २ दुचाकींची समोरासमोर धडक; तरुणाचा मृत्यू

**▸विदर्भ केसरी। ओतूर :**

जुन्नर तालुक्यातील ओतूर-ब्राह्मणवाडा जिल्हा मार्गावर ओतूर गावाच्या हद्दीतील फापाळेशिवार येथे सोमवारी (दि. २) रात्री सुमारे ९.३० वाजण्याच्या सुमारास दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक होऊन एका तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. वसंत सुरेश मुठे (वय २८, रा. त्रिशुलवाडी सातेवाडी, ता. अकोले, जि. अहिल्यानगर) असे मृत तरुणाचे नाव असल्याची माहिती ओतूर पोलिसांनी दिली. मिळालेल्या माहितीनुसार, अमोल लक्ष्मण गिते (रा. राहाटी मळा, ओतूर, ता. जुन्नर) हे दुचाकीवरून ओतूरच्या दिशेने जात होते. त्याचवेळी वसंत मुठे व त्यांचा मित्र अक्षय पांडुरंग मोढवे हे दुचाकीवरून ओतूरहून ब्राह्मणवाड्याकडे निघाले होते. दरम्यान, फापाळेशिवार हद्दीत दोन्ही दुचाकींची समोरासमोर भीषण धडक झाली. या अपघातात दोन्ही दुचाकींवरील तिन्ही तरुण गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करत जखमींना आळेफाटा येथील युनिक हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. मात्र उपचार सुरू असताना वसंत मुठे

# लोकसभेत भिरकावले कागद

## अडथळ्याबद्दल काँग्रेसचे आठ खासदार निलंबित

**▸विदर्भ केसरी। नवी दिल्ली**



लोकसभेत राष्ट्रपती अभिभाषणावरील चर्चेदरम्यान विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांच्या भाषणात आज सलग दुसऱ्या दिवशी प्रचंड गदारोळ झाला. पीठासीन अधिकाऱ्यांवर कागद भिरकावणाऱ्या काँग्रेसच्या आठ खासदारांना निलंबित करण्यात आले. चीनच्या कथित घुसखोरीबाबत माजी लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे (निवृत्त) यांच्या अप्रकाशित पुस्तकाच्या हवाल्याने दावे करू पाहणाऱ्या राहुल यांच्या भाषणात अडथळे आणण्याचा प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडून करण्यात आला. काँग्रेसच्या खासदारांनी घोषणाबाजी करत पीठासीन अधिकाऱ्यांवर कागद भिरकावले. या प्रकारानंतर काँग्रेसच्या आठ खासदारांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली.

यामध्ये काँग्रेसचे महाराष्ट्रातील खासदार प्रशांत पडोळे यांच्यासह मणिकम टागोर, गुरजितसिंग औजला, अमरिंदरराजा वडिंग, हायबी ईडन, किरण रेड्डी, एस. व्यंकटेशन आणि डीन कोरियाकोस यांचा समावेश आहे. या सर्वांना संपूर्ण अधिवेशन काळासाठी निलंबित करण्यात आले आहे. राहुल यांनी सोमवारी 'कॅराव्हॅन' नियतकालिकातील माहितीच्या आधारे चीनसंदर्भात दावे केल्यानंतर कामकाज विस्कळित झाले होते. त्याचीच पुनरावृत्ती आजही घडली.

### ती प्रत तपासणार

■ कामकाज दोन वेळा तहकूब झाल्यानंतर दुपारी दोनला चर्चेला सुरुवात झाली. त्यावेळी राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा सोमवारचाच मुद्दा उपस्थित करताना माजी लष्करप्रमुखांचा संदर्भ असलेल्या लेखाची प्रत प्रमाणित केली. लोकसभाध्यक्षांनी सोमवारी दिलेल्या निर्णयानुसार ही प्रत प्रमाणित करत असल्याचे त्यांनी नमूद केले. तालिका सभापती असलेले पीठासीन अधिकारी कृष्णाप्रसाद टेनेटी यांनी त्यांना ही प्रत सभापटलावर मांडण्यासाठी सांगितले आणि ती तपासल्यानंतर आपल्याला सांगितले जाईल, असेही पीठासीन अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

### विरोधी खासदारांना समज

■ राहुल गांधी यांनी चीन, पाकिस्तानचा उल्लेख करून बोलायला सुरवात करताच पीठासीन अधिकाऱ्यांनी त्यांना अभिभाषणावर बोलायला सांगितले. त्यातच यात विरोधी बाकांवरून झालेल्या टिपणीमुळे नाराज अधिकाऱ्यांनी विरोधी पक्षांच्या खासदारांनाही समज दिली. राहुल गांधींनी नियतकालिकातील लेखाचा हवाला देऊन राष्ट्रीय सुरक्षेवर आपले मत मांडण्याचा प्रयत्न करताच पीठासीन अधिकाऱ्यांनी पुढील वक्त्याचे नाव पुकारले. संतप्त झालेल्या विरोधी पक्षाच्या खासदारांनी हौद्यात उतरून गोंधळ घालायला सुरवात केली. त्यात घोषणा देताना त्यांनी कागदेही भिरकावली. अखेरीस पीठासीन अधिकारी कृष्णाप्रसाद टेनेटी यांनी सभागृहाचे कामकाज दुपारी तीन वाजेपर्यंत तहकूब केले. दिलीप सैकिया हे पीठासीन असतानाही कागदे भिरकावण्यात आली होती.

### काँग्रेसचे निदर्शने

■ संसदेत गोंधळ घालणे आणि अध्यक्षांच्या दिशेने कागद फेकण्याच्या घटनेप्रकरणी सत्ताधारी भाजपतर्फे लोकसभा अध्यक्षांकडे तक्रार करण्यात आली आणि गोंधळ घालणाऱ्या खासदारांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यापार्श्वभूमीवर सभागृह सुरू झाल्यानंतर सभागृहातील गैरवर्तनावरून संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी विरोधी पक्षाच्या खासदारांवर निलंबनाच्या कारवाईचा प्रस्ताव मांडला. त्यानंतर पीठासीन अधिकारी असलेले दिलीप सैकीया यांनी काँग्रेसच्या आठ खासदारांना निलंबित करण्यात येत असल्याचे जाहीर केले आणि सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब केले. या कारवाईनंतर निलंबित झालेल्या खासदारांसह काँग्रेसच्या सर्व सदस्यांनी राहुल गांधींसमवेत संसद भवनाच्या आवारात निदर्शन केली.



## धारणीच्या जंगलात चौकीदार निघाला चोर

**▸विदर्भ केसरी। धारणी,**

पश्चिम मेळघाटातील प्रादेशिक वन विभागाचा परतवाडा विभाग लाकूड तस्करीसाठी प्रसिद्ध आहेतच. आता मात्र धारणी शहरालगतच्या जंगलातील एका शेतात जवळपास २ घन मीटर लाकूड जप्त करण्यात आल्याने चौकीदारच चोर असल्याची चर्चा सुरू झालेली आहे.

प्रादेशिक वन विभागाच्या धारणी व सुसर्दा या वनपरिक्षेत्रात अनेक वेळा अवैध वृक्षतोड करुन लाखो रुपयांच्या सोनेरी सागवानाची तस्करी यापूर्वी झालेली आहे. आता मात्र, अजब-गजब मेळघाटाच्या नावानुरूप एक घटना उजेडात आल्याने एकच खळबळ माजलेली आहे. धारणी शहराजवळच्या बोड जंगलातील एका शेतात लपवून ठेवलेले सागाचे लाकूड रेंजर लियाकत शेख यांनी पकडलेले आहे. पूर्ण लाकूड धारणी आगारात जमा करुन पुढील तपास वनपरिक्षेत्र आधिकारी यांच्या मार्गदर्शनात वर्तुळ अधिकारी पी. डी. वानखडे करत आहेत. या प्रकरणी पूर्ण प्रकरण नोंद करण्यात आल्याची माहिती असून अंदाजे २ घन मीटर सागाचे लाकूड आहे.

मागील तीन वर्षात सुसर्दा आणि धारणी रेंजच्या जंगलातून इमारतीसाठी लागणाऱ्या लाकडाची तस्करी मध्य प्रदेशात करण्यात आलेली होती. एकवेळा सुसर्दाच्या अधिकाऱ्यांनी गुन्हा कायम केला होता. मात्र आरोपी व लाकूड आजपर्यंत अप्राप्त आहेत. धारणीच्या जंगलातून अवैध वृक्षतोड करुन मध्य प्रदेशच्या बैतुल जिल्ह्यात तस्करीने सागाचे लाकूड नेले जाते. एका घटनेत बैतुल वन विभागाच्या कारवाईनंतर प्रादेशिक वनविभागाने थातुर-मातूर कारवाई केलेली होती. धारणी व सुसर्दाच्या जंगलात अवैध वृक्ष तोडीसाठी कंपू कार्यरत असल्याची गंभीर माहिती असून प्रत्येक जंगलातील थूट मोजण्याची कारवाई वन विभागाने तात्काळ करावी, अशी मागणी आहे.

## २२ फेब्रुवारीला विदर्भ राज्य समीतीचे आंदोलन

**▸विदर्भ केसरी। कारंजा :-**




03.फेब्रुवारी 2026 रोजी शासकीय विश्रामगृह कारंजा येथे विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीमध्ये स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माण करण्याकरिता दिनांक 22 फेब्रुवारी 2026 रोजी नागपूर येथे रॅली व मेळाव्याचे आयोजन केले आहे. सदर मेळाव्यामध्ये मोठ्या संख्येने विदर्भातील जनतेने उपस्थित रहावे असे पदाधिकाऱ्यांनी सर्वांना आवाहन करण्यात आले

तेलंगणा राज्याप्रमाणे शेतकरी शेतमजुरांना सवलती व योजना मिळाव्या, स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माण झाल्यास विदर्भातील शेतकरी, शेतमजूर, महिला , बेरोजगारांना रोजगार मिळणे, उद्योगधंद्यांचा कसा विकास होईल यासंदर्भात मार्गदर्शन केले. कार्यक्रमांमध्ये एड. वामनरावजी चटप माजी आमदार अध्यक्ष विदर्भ राज्य आंदोलन समिती, प्रा. पृथ्वीराजसिंह राजपूत पश्चिम विदर्भाध्यक्ष, श्रीमती रंजनाताई मामर्डे महिला प्रदेशाध्यक्ष, राजू अवताडे जिल्हाध्यक्ष, डॉ. रमेश चंदनशिव जिल्हा समन्वयक, विजयभाऊ ढळे उपाध्यक्ष, विजयभाऊ देशमुख कारंजा तालुका अध्यक्ष काँग्रेस पार्टी, बाळासाहेब दहातोंडे पोहा, महादेवराव शिंदे, बंडूभाऊ इंगोले, अताऊल्ला शेख सर, प्रदीप अवताडे, विष्णूभाऊ लसनकुटें, मन्नानभाई कामनवाले, जहीर शेख, करीम भाई, दिगंबर सराफ, ओमप्रकाश तापडिया, गजाननराव उद्धव वनारसे, गजाननराव अमदाबादकर, गोरखनाथ वानखडे संपर्कप्रमुख, प्रदीप वानखडे, विनोद गणवीर प्रसिद्धीप्रमुख, धम्मपाल इंगळे, शब्बीर भाई, डॉ.विठ्ठलराव घाडगे, नानाभाऊ देवळे, बाळूभाऊ चव्हाण मानोरा तालुकाध्यक्ष, रऊफभाई मामू व इतर पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## व्हिडीओ व्हायरलची धमकी देत महिलेवर सामूहिक अत्याचार

**▸विदर्भ केसरी। अकोला**

अश्लील व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत एका विवाहित महिलेवर वारंवार बलात्कार करून तिचे शारीरिक व मानसिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार अकोल्यात उघडकीस आला आहे. या प्रकरणात पीडित महिलेला धर्मांतरासाठीही सातत्याने दबाव टाकण्यात आल्याचा गंभीर आरोप असून, सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात तीन आरोपींविरुद्ध विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी दोघांना अटक करण्यात आली असून एक आरोपी सध्या रुग्णालयात उपचार घेत आहे. डाबकी रोड परिसरात राहणारी व ब्युटी पार्लर चालवणाऱ्या एका विवाहित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून हा प्रकार समोर आला. फिर्यादी महिला गांधी रोड परिसरातील एका दुकानात पार्लरसाठी लागणारे साहित्य खरेदीसाठी नियमित जात होती. नवीन साहित्याची माहिती देण्याच्या बहाण्याने दुकान संचालकाने तिचा मोबाईल क्रमांक घेतला व तिचा विश्वास संपादन केला. एका दिवशी दुकानात कोणी नसल्याची संधी साधून आरोपीने फिर्यादी महिलेशी अत्याचार करून त्याचा व्हिडीओ मोबाईलमध्ये रेकॉर्ड केला. हा व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत तिच्यावर दगडी पूल परिसरातील एका फ्लॅटवर नेऊन जबरदस्तीने अत्याचार करण्यात आला. इतकेच नव्हे तर साथीदारांसोबतही जबरदस्ती संबंध ठेवण्याचा दबाव टाकण्यात आला, असे तक्रारीत नमूद आहे. हा छळ दीर्घकाळ सुरू असल्याचे फिर्यादीने आपल्या जबाबात नमूद केले आहे.

याप्रकरणी पोलिसांनी आरोपीना ताब्यात घेऊन आरोपीच्या मोबाईलची तपासणी केली असता त्यामध्ये अनेक महिलांचे अश्लील फोटो व व्हिडीओ आढळून आले. त्यात फिर्यादीच्या ओळखीतील एका महिलेचाही समावेश असून, तिनेही आपले अशाच प्रकारे शोषण झाल्याची माहिती दिली आहे. त्यामुळे या प्रकरणाचा आवाका अधिक व्यापक असल्याची शक्यता व्यक्त होत आहे. फिर्यादी महिलेच्या म्हणण्यानुसार, अश्लील व्हिडीओ डिलीट करून देण्याच्या बदल्यात आरोपींकडून सातत्याने धर्मांतरासाठी दबाव टाकण्यात येत होता.

## चंद्रपूर सुपर थर्मल पॉवर स्टेशनमध्ये कोट्यवधींचा निविदा घोटाळा

**▸विदर्भ केसरी। कुणाल गायकवाड**

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या ( महाजेनको) चंद्रपूर सुपर थर्मल पॉवर स्टेशनमध्ये (CSTPS) निविदा प्रक्रियेत मोठा गैरव्यवहार झाल्याचे खळबळजनक प्रकरण समोर आले आहे. संचालक संजय मारुडकर आणि मुख्य अभियंता विजय राठोड यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून, ठराविक ठेकेदारांशी हातमिळवणी करत कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप लोकप्रतिनिधींकडून करण्यात आला आहे. मात्र, विधिमंडळात तारांकित प्रश्न उपस्थित होऊनही अद्याप कोणतीही कारवाई न झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे

मिळालेल्या माहितीनुसार, विविध बांधकामांच्या निविदा प्रक्रियेत नियमांना बगल देऊन आपल्या मर्जीतील ठेकेदारांना फायदा पोहोचवण्यासाठी अटींमध्ये फेरफार करण्यात आले. यात प्रामुख्याने खालील निविदांचा समावेश आहे:

RFX ३००००६२८४७: सुमारे ७.८२ कोटी रुपये.
RFX ३००००६२८०२: सुमारे १८ कोटी रुपये.
RFX ३००००६२९८७: सुमारे १.४७ कोटी रुपये.

मुख्य अभियंता विजय राठोड यांनी निविदेच्या नियमात बदल करून 'कन्व्हेयर बेल्ट स्ट्रक्चर' बांधकामाचा अनुभव अनावश्यकरीत्या अनिवार्य केला. यामुळे पात्र ठेकेदारांना जाणीवपूर्वक अपात्र ठरवण्यात आले, तर मर्जीतील 'सिंडिकेट' मधील ठेकेदारांना तांत्रिकदृष्ट्या पात्र करून कोट्यवधींचे कंत्राट बहाल करण्यात आले. आमदार अनिल परब यांचा तारांकित प्रश्न या गंभीर प्रकरणाची दखल घेत आमदार ॲड. अनिल परब यांनी हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. त्यांनी या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करण्याची आणि संबंधित ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याची मागणी केली होती तसेच या अधिकाऱ्यांची मालमत्ता त्यांच्या ज्ञात उत्पन्नापेक्षा किती पटीने जास्त आहे याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेमार्फत करण्याची मागणी लावून धरली होती

अधिवेशन संपूनही आणि ठोस पुरावे समोर असूनही संचालक संजय मारुडकर आणि मुख्य अभियंता संजय राठोड यांच्यावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही या विलंबनामुळे या भ्रष्ट अधिकाऱ्यांना वरिष्ठ किंवा राजकीय नेत्याचा पाठिंबा तर नाही ना? अशी शंका आता सर्वसामान्य जनतेतून व्यक्त केली जात आहे जर लोकप्रतिनिधींनी पुराव्यासह प्रश्न मांडूनही कारवाई होत नसेल तर पारदर्शक कारभाराचा दावा फुल आहे सरकारी निधीचा अपव्य करणाऱ्या या ठेका सिंडिकेट चा पर्दा फाश कधी होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

# जन्मनोंदीचा घोटाळा तपास पाच राज्यात

## सिस्टीम हॅक : किरीट सोमय्या यांचा दावा, यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ,**



जन्म नोंदींच्या माध्यमातून शेंदुरसनी तसेच इतर ठिकाणी बनावट नोंदी आढळल्या आहेत. हा मुद्दा आता देशव्यापी झाला आहे. तपास पाच राज्यांपर्यंत पोहोचला असून याची व्याप्ती मोठी असल्याचे भाजप नेते किरीट सोमय्या म्हणाले. त्यांनी मंगळवारी (ता. तीन) जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला. बनावट नोंदीचा हा घोटाळा मोठा आहे. आतापर्यंत बिहार, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र या पाच राज्यांमध्ये याची गँग सक्रिय असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. संबंधित टोळ्यांनी संपूर्ण जन्म नोंदणी प्रणालीच हॅक केल्याचा संशय माजी खासदार सोमय्या यांनी व्यक्त केला. नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील एका गावची लोकसंख्या अवघी १५०० असताना, ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२५ या तीन महिन्यांत तब्बल १५ हजार ५७० जन्म नोंदी झाल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, या नोंदींमधील एकही व्यक्ती महाराष्ट्रातील नाही. ही बाब अत्यंत गंभीर असून प्रशासनाच्या हलगर्जीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करते. या संपूर्ण प्रकरणात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महाराष्ट्र पोलिस महासंचालक यांनी तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी सोमय्या यांनी केली आहे. तसेच या घोटाळ्याचा पर्दाफाश करणाऱ्या यवतमाळ महसूल, आरोग्य तसेच पोलिसांच्या मेहनतीचे कौतुक केले.

### राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न?

■ एसआयटी तपासात जन्म नोंदी हॅक करून बनावट पासपोर्ट, बेनामी फंड ट्रान्स्फर आणि लाभार्थी कोण, याचा सखोल तपास सुरू आहे. स्लिपर सेल तयार होत आहेत का? दहशतवादासाठी याचा वापर होतोय का? याची चौकशी पोलिस महासंचालकांनी गांभीर्याने करावी, अशी मागणी माजी खासदार किरीट सोमय्या यांनी केली आहे.

## सृष्टी तायडे यांना राज्यस्तरीय 'महाराष्ट्र नृत्य रत्न नटराज पुरस्कार २०२६'

**▸विदर्भ केसरी। येवदा दि.२**



येवदा येथील सुप्रसिद्ध व बहुगुणी नृत्यकलावंत सृष्टी सविता प्रकाश तायडे यांना नृत्यकलेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल राज्यस्तरीय 'महाराष्ट्र नृत्य रत्न नटराज पुरस्कार २०२६' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्रातील नृत्य क्षेत्रात सातत्यपूर्ण, दर्जेदार व प्रभावी कार्य करणाऱ्या कलाकारांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार दिला जातो. शास्त्रीय तसेच लोकनृत्य प्रकारात सृष्टी तायडे यांनी केलेली अथक मेहनत, उत्कृष्ट सादरीकरण आणि कलात्मक साधना याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. नृत्यकलेबरोबरच सृष्टी तायडे या चित्रकला, रांगोळी, मेकअप, मेहंदी, क्राफ्ट, डेकोरेशन व हेअर स्टाईल या विविध कलांमध्येही पारंगत असून त्या एक अष्टपैलू कलाकार म्हणून ओळखल्या जातात. आजवर श्रृष्टी यांना शेकडो पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. पुरस्कार स्वीकारताना सृष्टी तायडे म्हणाल्या, "हा सन्मान माझ्या नृत्यगुरू सौ. अर्चना जितेश रापर्तीवार, माझे आई-वडील, भाऊ डॉ. सुधांशु तसेच माझ्यावर प्रेम करणाऱ्या सर्व प्रेक्षकांचा आहे. पुढील काळात नृत्यकलेद्वारे व इतर कलांच्या माध्यमातून समाजासाठी अधिक योगदान देण्याचा माझा संकल्प आहे."

रामकृष्णहरी विश्वमानव मंदिर, दास टेकडी, मोझरी व पद्मश्री फाउंडेशन, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान डॉ. संजयजी आदमने (अध्यक्ष, पद्मश्री फाउंडेशन नागपूर), प्रमोद भोंगे (ग्रामगीताचार्य, पुलगाव), शंकरराव मोहोड (ग्रामगीताचार्य, वर्धा), राष्ट्रीय कीर्तनकार अशोक भगत, ह.भ.प. विलास महाराज साबळे (अध्यक्ष, दास टेकडी), डॉ. किरणताई खडसे व गुरू अर्चनाताई रापर्तीवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
बुधवार, ४ फेब्रुवारी २०२६ | २

## अग्रलेख

# फुसका बार...!

सलग नवव्यांदा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणा-या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सर्वसामान्यांचा पूर्णत: अपेक्षाभंग केला आहे. या अर्थसंकल्पात नवे असे काहीच नाही. 'मागच्या पानावरून पुढे चालू' अशा प्रकारचा हा अर्थसंकल्प आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या दृष्टीने हा अर्थसंकल्प म्हणजे फुसका बारच ठरला असे म्हणावे लागेल. पर्यटन क्षेत्राच्या विकासावर भर, हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर, ५ लाख लोकसंख्येच्या शहरांचा विकास आणि बायो मेडिकल हब तयार करण्याबाबतची आमिषे या अर्थसंकल्पात दाखवण्यात आली आहेत. या अर्थसंकल्पात करश्रेणीत बदल करण्यात येतील, जुनी करश्रेणी आणि नवीन करश्रेणीतील संभ्रम दूर करण्यात येतील तसेच सर्वसामान्य करदात्यांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती, पण अर्थमंत्र्यांनी या अपेक्षांवर पाणी फेरले आहे. करश्रेणीत कोणतेही बदल केलेले नाहीत. त्यामुळे सर्वसामान्यांवरील कराचा बोजा तसाच राहणार आहे. इन्कम टॅक्सबद्दल मोठी घोषणा होईल असे वाटले होते परंतु तसे काहीच झाले नाही. इन्कम टॅक्स आहे तसाच राहणार आहे. नवीन आयकर कायदा १ एप्रिल २०२६ पासून लागू होणार आहे. आयटीआर दाखल करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्टपर्यंत वाढवण्यात आली आहे. मालमत्ता विकणा-या एनआरआयसाठी टीडीएस नियमांमध्ये बदल करण्यात आले आहेत. अपघाती विम्यावर मिळणा-या रकमेवर कोणताही टॅक्स लागणार नाही. सुधारित रिटर्नसाठी अंतिम मुदत वाढविण्यात आली आहे. अर्थमंत्र्यांनी घोषणा केली की, आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये राजकोषीय तूट जीडीपीच्या ४.३ टक्के राहण्याचा अंदाज आहे. भारताला औषधनिर्मितीचे हब बनवू, पायाभूत सुविधा, एमएसएमई आणि उद्योगांना चालना देऊ असे म्हटले आहे. इलेक्ट्रॉनिक्स पार्टस् उत्पादनासाठी ४० हजार कोटींचा प्रस्ताव आहे. सरकार दुर्मिळ रेअर अर्थ मॅग्नेट कॉरिडॉर तयार करणार आहे. जागतिक-मानक औषध नियामक स्थापन करणार असून तीन केमिकल पार्क उभारले जाणार आहेत. सेमीकंडक्टर मिशन २.० राबवले जाणार असून त्यामुळे पुरवठा साखळीला मदत होणार आहे. महात्मा गांधी ग्राम स्वराज योजना राबवली जाणार असून त्यातून 'एक जिल्हा एक उत्पादन' आणि ग्रामीण भागातील तरुणांना प्रशिक्षण व उद्योग मिळणार आहे. खेळासाठी लागणा-या वस्तूंच्या उत्पादनावर भर दिला जाणार आहे. बायो फार्मातील संशोधन वाढवण्यासाठी ३ नवीन शैक्षणिक संस्था उभारल्या जाणार आहेत. टेक्स्टाईल सेक्टरसाठी, टेक्स्टाईल एक्सपॅन्शन योजना राबवली जाणार आहे. हातमागाला प्राधान्य दिले जाणार आहे. ५ लाखांहून जास्त लोकसंख्येच्या शहरांचा विकास केला जाणार असून त्यासाठी दरवर्षी ५ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मालवाहतुकीसाठी पर्यावरणपूरक कॉरिडॉर उभे केले जाणार आहेत. २५ कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढल्याचा सरकारचा दावा आहे.मायक्रो, स्मॉल, मिडियम एंटरप्रायजेस (एमएसएमई) क्षेत्रावर विशेष लक्ष केंद्रित केल्याचे सूचित करताना निर्मला सीतारामन यांनी यासाठी स्वतंत्र १० हजार कोटी रुपयांचा निधी उभारत असल्याची घोषणा केली. यासोबतच २०२३ मध्ये स्थापन झालेल्या सेल्फ रिलायंट इंडिया फंडसाठी आणखी ४ हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी जाहीर करण्यात आला आहे. यामुळे नव्याने उभ्या राहणा-या एमएसएमईला सातत्याने भांडवल पुरवठा होत राहील व याचा थेट फायदा उद्योजकांना मिळणार आहे, असा सरकारचा दावा आहे. मात्र, प्रत्यक्षात कोरोना संकटात कोलमडून पडलेल्या एमएसएमईमुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार बुडाले व अर्थव्यवस्थेची गतीही मंदावली होती. अद्यापही हे अर्थव्यवस्थेचे इंजिन असणारे लघु, मध्यम व सूक्ष्म उद्योग कोरोनाच्या फटक्यातून सावरलेले नाहीत. त्यांना उभे करण्यासाठी मात्र सरकार थेट मदतीचा हात देत नाही. मग अर्थव्यवस्थेला व रोजगारनिर्मितीला गती कशी मिळणार हा प्रश्नच आहे. याचे उत्तर मात्र निर्मला सीतारामन आपल्या विक्रमी नवव्या अर्थसंकल्प सादरीकरणातून देत नाहीत. फक्त देशातील २०० जुन्या उद्योग संकुलांमध्ये पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान व आधुनिक यंत्रणांचा समावेश करण्याची घोषणा करतात. प्रत्यक्षात त्यासाठीची आर्थिक तरतूद मात्र स्पष्ट करत नाहीत. मग अर्थसंकल्प मांडताना जी तीन कर्तव्ये सांगितली त्यापैकी रोजगारनिर्मितीला चालना हे कर्तव्य कसे पार पाडणार हे गौडबंगालच आहे. विशेष म्हणजे मागच्या अर्थसंकल्पात रोजगारनिर्मितीला चालना देण्यासाठी ज्या योजना सरकारने मांडल्या होत्या त्याचा लेखाजोखा हा अर्थसंकल्प मांडत नाही की या योजनांचे भविष्य काय? हेही या अर्थसंकल्पात स्पष्ट करत नाही हे विशेष! थोडक्यात रोजगारनिर्मिती हे कर्तव्य असल्याचा दावा फक्त कागदावरच मान्य करण्यात सरकार धन्यता मानते का? असा प्रश्न निर्माण होतो. आर्थिक सर्वेक्षणात तरुणांच्या क्रयशक्तीला चालना मिळण्याचा मुद्दा मांडण्यात आला होता. त्याचे कुठलेही प्रतिबिंब प्रत्यक्ष अर्थसंकल्पात दिसत नाही, हे दुर्दैवच! हीच स्थिती कृषी क्षेत्राची आहे

# दोन अधिकाऱ्यांना पाच हजारांची लाच घेताना अटक

**▸विदर्भ केसरी। दिग्रस**

येथील भूमिअभिलेख कार्यालयातील उपअधीक्षक व भूमापक या दोन अधिकाऱ्यांना मंगळवारी ता. ३ मालमत्तेच्या फेरफार प्रकरणात पाच हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ अटक केल्याने एकच खळबळ उडाली आहे. उपअधीक्षक सखाराम नरसिंग पवार व नझुल परिरक्षण भूमापक आशिष काशिनाथ शेलोकर अशी अटक केलेल्या अधिकाऱ्यांची नावे आहेत.

या प्रकरणातील महिला तक्रारदारांच्या सासऱ्यांनी त्यांची मालकीची मालमत्ता तक्रारदार व त्यांच्या पतीस बक्षीसपत्राद्वारे दिली होती. त्यानुसार मालमत्तेचा फेरफार करून घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे भूमिअभिलेख कार्यालयातील आरोपी आशिष शेलोकर यांच्याकडे सादर केली. त्यावेळी त्यांनी उपअधीक्षक सखाराम पवार यांची भेट घेण्यास सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी भेट घेतली असता त्यांनी या कामासाठी पाच हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप तक्रारदाराने केला. याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागात अधिकृत तक्रार दाखल केली. तक्रारीच्या अनुषंगाने एसीबी पथकाने पडताळणी कारवाई केली. या पडताळणीदरम्यान आरोपी आशिष शेलोकर यांनी फेरफार करण्यासाठी स्वतःसाठी व उपअधीक्षक यांच्यासाठी एकूण पाच हजार रुपयांची मागणी केली. त्यानंतर आयोजित सापळा कारवाईदरम्यान आरोपी शेलोकर यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडून पाच हजार रुपये स्वीकारले. यापैकी अडीच हजार रुपये स्वतःकडे ठेवून उर्वरित अडीच हजार रुपये उपअधीक्षक सखाराम पवार यांना देताना दोन्ही आरोपींना उपअधीक्षकांच्या कक्षात रंगेहाथ पकडण्यात आले. या प्रकरणी दिग्रस पोलिसात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.



# नवस फेडण्यासाठी निघालेल्या कुटुंबावर घाला, मुलगी ठार

**▸विदर्भ केसरी।**

नवस फेडण्यासाठी आनंदाने जाणाऱ्या एका कुटुंबावर काळाने घाला घातला आहे. पुसद-उमरखेड रोडवरील महावीर नगरजवळ चालकाचे नियंत्रण सुटल्याने ॲपे ऑटो पलटी होऊन झालेल्या भीषण अपघातात १० वर्षीय चिमुकलीचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात तिची आई गंभीर जखमी झाली असून, त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. ही हृदयद्रावक घटना मंगळवारी ३ फेब्रुवारीला दुपारी १२:३० वाजेच्या सुमारास घडली. दिपाली अतुल सुरोशे वय १० वर्ष रा. शिवाजी वार्ड, पुसद असे मृत चिमुकलीचे नाव आहे. तर सपना सतीश सुरोशे असे गंभीर जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे.

या प्रकरणी पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पुसद येथील शिवाजी वार्डात राहणारे सुरोशे कुटुंब उमरखेड तालुक्यातील पळशी गावाजवळील मनुला येथे सटवाई देवीची यात्रा व नवस फेडण्यासाठी जात होते. सतीश बंडू सुरोशे (२२) हा आपला ऑटो क्रमांक एम-२५-एन-३१३५ घेऊन जात असताना, महावीर नगरजवळील वळणावर अचानक पुढे आलेला खड्डा चुकवत असतांना त्यांचा ऑटोवरचे नियंत्रण सुटले आणि ऑटो पलटी झाला. यात उजव्या बाजूला बसलेली दिपाली ऑटोखाली दबली गेली. तिच्या डोक्याला आणि मेंदूला गंभीर दुखापत झाल्याने तिचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघाताचा आवाज होताच स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली आणि जखमींना तातडीने उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. सपना सुरोशे यांची प्रकृती गंभीर आहे. या घटनेची माहिती मिळताच पुसद शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे.

# 58 हजार 'लाडक्या बहिणींची पडताळणी अधांतरीच

**▸विदर्भ केसरी।**

मुख्यमंत्री 'माझी लाडकी बहीण' योजनेत तांत्रिक त्रुटींमुळे लाभापासून वंचित राहिलेल्या जिल्ह्यातील ५८ हजार ८४ महिलांच्या फेरपडताळणीची प्रक्रिया करण्याचे राज्यशासनाने निर्देश दिले होते. यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने ३० जानेवारीपासून प्रत्यक्ष पडताळणीचे आदेश दिले असताना, अंगणवाडी कर्मचारी संघटनांनी हे काम योजनाबाह्य असल्याचे सांगत कामावरच बहिष्कार घातला आहे. यामुळे पडताळणी पासून वंचित राहिलेल्या जिल्ह्यातील लाभार्थी महिलांची पडताळणी पुन्हा रखडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

नोंदणीदरम्यान ई-केवायसीतील चुका व इतर तांत्रिक अडचणींमुळे अनेक पात्र महिलांचे लाभ बंद झाल्याच्या तक्रारी महिला व बालविकास विभागाकडे आल्या होत्या. या पार्श्वभूमीवर शासनाने २० जानेवारीला नव्या आदेशाद्वारे लाभार्थ्यांची प्रत्यक्ष पडताळणी करण्याचे निर्देश दिले. यानुसार अंगणवाडी सेविकांनी घरोघरी जाऊन वय, कुटुंबातील नोकरी/सेवानिवृत्ती स्थिती आदी निकष तपासणे अपेक्षित आहे.

**संघटनेपुढे तिढा आणि संघर्षाची शक्यता जिल्हा प्रशासनाने पडताळणीचे आदेश दिले असले तरी हे काम आपल्या कार्यकक्षेत नसल्याचा इशारा अंगणवाडी कर्मचारी संघटनेने दिला आहे. त्यामुळे पडताळणीवरून प्रशासन व संघटना यांच्यात तिढा निर्माण होण्याची शक्यता आहे.**

**पडताळणीच्या याद्या तयार करण्यात येत आहेत**

**"योजनेतून वगळलेल्या महिलांच्या याद्या अंगणवाडी सेविकांकडे देण्यात आल्या आहेत. घरोघरी जाऊन पडताळणी करण्याची तयारी पूर्ण झाली आहे."**

**- विशाल जाधव, महिला व बालकल्याण अधिकारी, यवतमाळ.**


# सामूहिक कॉपी आढळल्यास केंद्रच बंद

## जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश; कॉपीमुक्त परीक्षेसाठी प्रशासनाचा निर्णय

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

कोणत्याही परीक्षा केंद्रावर सामूहिक (मास) कॉपी आढळल्यास संपूर्ण केंद्रावर कारवाई केली जाणार आहे. तसा निर्णय मंगळवारी (ता. तीन) जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दक्षता समितीच्या बैठकीत घेण्यात आला.

इयत्ता बारावीची परीक्षा १० फेब्रुवारीपासून, तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होत आहे. ७४ हजार १६६ विद्यार्थी इयत्ता दहावी-बारावीची परीक्षा देणार आहेत. यात दहावीचे ३८ हजार ७४६, तर बारावीचे ३५ हजार ३५२ विद्यार्थी परीक्षेला सामोरे जाणार आहेत. बारावीची परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च, तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत होणार आहे. परीक्षेसाठी यंत्रणा सज्ज झाली असून तयारी केली जात आहे. परीक्षा भयमुक्त व कॉपीमुक्त वातावरणात



व्हाव्यात यावर प्रशासनाचा भर आहे. यासंदर्भात मंगळवारी (ता.तीन) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा दक्षता समितीची बैठक झाली. बैठकीत परीक्षा प्रक्रियेत कोणतीही गैरप्रकार, कॉपी किंवा बाह्य हस्तक्षेप होऊ नये यासाठी कठोर आणि स्पष्ट निर्णय घेण्यात आले. परीक्षेदरम्यान तालुकास्तरावर महसूल व ग्रामविकास यंत्रणांच्या संयुक्त भरारी पथकांद्वारे अचानक भेटी दिल्या जाणार आहेत. प्रत्येक परीक्षा केंद्रावर बैठे पथक तैनात राहणार आहे. सर्व विभागांच्या समन्वयातून परीक्षा सुरळीत पार पाडण्यावर भर देण्याचे आदेश जिल्हाधिकारी मीना यांनी दिले. बैठकीला पोलिस अधीक्षक कुमार चिंता, माध्यमिक शिक्षणाधिकारी किशोर पागोरे, डाएटचे प्राचार्य रमेश राऊत, प्राथमिक शिक्षणाधिकारी प्रकाश मिश्रा, माध्यमिक उपशिक्षणाधिकारी योगेश डाफ, विद्युत विभागाचे अभियंता चव्हाण उपस्थित होते.

- **जिल्ह्यातील परीक्षा भयमुक्त, पारदर्शक आणि पूर्णतः कॉपीमुक्त वातावरणातच झाल्या पाहिजेत. यासाठी कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही. ज्याठिकाणी कॉपी होईल त्याठिकाणी कारवाई केली जाईल. - विकास मीना, जिल्हाधिकारी, यवतमाळ.**
- **ड्रोन, झुम ॲपद्वारे नियंत्रण ज्या परीक्षा केंद्रांवर बाहेरून लोकांचा उपद्रव होण्याची शक्यता आहे, अशा केंद्रांवर ड्रोनच्या माध्यमातून नजर ठेवण्यात येणार आहे. तसेच ज्या केंद्रांवर वर्गामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे उपलब्ध नाहीत, अशा ठिकाणी झूम ॲपद्वारे जिल्हा नियंत्रण कक्षातून थेट निरीक्षण केले जाणार आहे. यासोबतच संबंधित केंद्रावरील केंद्रसंचालक आणि वर्गातील पर्यवेक्षक बदलण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.**

# पोलिसांना मारहाण प्रकरणी दोन आरोपींची निर्दोष मुक्तता

## अचलपूर जिल्हा व सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**▸विदर्भ केसरी। अचलपूर (प्रतिनिधी):**

सरकारी कामात अडथळा आणून पोलिसांना बेदम मारहाण केल्याच्या आरोपातून दोन मुख्य आरोपींची अचलपूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश (क्र. २) यांनी ३ फेब्रुवारी २०२६ रोजी हा निकाल दिला. या प्रकरणात बचाव पक्षाचे वकील ॲड. मो. अमीन मेमन यांचा युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरला

नेमकी घटना काय होती?



चादुरबाजार पोलीस स्टेशन हद्दीतील गौरखेडा गावात बेकायदेशीररीत्या गावठी दारूची विक्री होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पी.एस.आय. आगरे व त्यांच्या सहा सहकाऱ्यांनी संबंधित ठिकाणी धाड टाकली. जप्त केलेला माल ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू असताना, आरोपी क्रमांक १ व २ यांनी पोलिसांना अवाच्य भाषेत शिवीगाळ करत सरकारी कामात अडथळा आणला व पोलिसांना मारहाण केली, असा आरोप पोलिसांकडून करण्यात आला होता या घटनेत जखमी झालेल्या पोलिसांवर उपचार करण्यात आले होते. आरोपींविरुद्ध भा.दं.वि. कलम ३५३, ३३२, २९४, ५०६ व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास पूर्ण झाल्यानंतर दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले. सरकार पक्षाकडून एकूण ७ साक्षीदारांची साक्ष घेण्यात आली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर, पुराव्याअभावी तसेच बचाव पक्षाच्या प्रभावी पैरवीच्या आधारे न्यायालयाने दोन्ही आरोपींना सर्व आरोपांतून निर्दोष मुक्त करण्याचे आदेश दिले.

# दुचाकीसह पंप चोरीतील पाच चोरटे जेरबंद



**▸विदर्भ केसरी। उमरखेड**

उमरखेड, महागाव, दराटी व हदगाव पोलिसांच्या हद्दीतून मोटार सायकलसह पाण्याच्या मोटार पंप चोरीच्या १२ गुन्ह्याचा उकल करीत, ५ लाख ४१ हजारांचा मुद्देमालासह पाच चोरट्यांना जेरबंद करण्यात आले. स्थानिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली. साजिद खान वाजीद खान, शेख उमेर शेख मुजीब, मोहम्मद रेहान मोहम्मद रफी रा. तिघेही उमरखेड, श्रीकांत ऊफ शेरा बालाजी सूर्यवंशी रा. हदगाव व एक विधीसंघर्ष बालक अशी अटक केलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. यवतमाळ व नांदेड जिल्ह्यात काही महिन्यांपासून मोटार सायकल व पाण्याच्या मोटार पंप चोरट्यांनी थैमान घातला होता. गुप्त माहितीच्या आधारे संशयित आरोपींना अंबवना तलावाजवळ ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आरोपींनी चोरीची कबुली दिली. उमरखेड, हदगाव, महागावसह दराटी पोलिस स्टेशन हद्दीतील थैमान घालणार्‍!या पाच चोरट्यांकडून तब्बल १३ मोटार सायकलसह ९ मोटार पंप व जवळपास ५ लाख ४१ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यामुळे १२ गुन्ह्याची उकल एकच वेळी झाली आहे. आरोपींना उमरखेड पोलिसांच्या स्वाधीन केले. ही कारवाई पोलिस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्यासह धीरज बांडे, शरद लोहकरे, रवींद्र श्रीरामे, मुन्ना आडे, संतोष भोरगे, तेजाब रणखांब, सुभाष जाधव, रमेश राठोड, कुणाल मुंडोकार, सुनील पंडागळे, राजेश जाधव आदींनी पार पाडली.

# तीर्थक्षेत्र 'ब' दर्जा असूनही शिरसगाव कसब्यात रस्ते खड्डेमय !

## ग्रामपंचायत, बांधकाम विभागाचे दुर्लक्ष?; ग्रामस्थांच्या भावना : शासनाचा निधी रस्त्यावर नाही तर कुठे होतोय खर्च?;नागरिकांमध्ये चर्चा

**▸विदर्भ केसरी। शिरसगाव कसबा**

प्रतिनिधी अक्षय गुर्जर:- अमरावती जिल्ह्यातील सर्वात मोठी शिरसगाव कसबा ग्रामपंचायत असून सदस्य संख्या सतरा आणि गावाची लोकसंख्या अंदाजित तीस हजाराच्या वर असूनही विकासकामात मात्र मागे पडताना दिसत असल्याचे चित्र गावकऱ्यांच्या चर्चेतून दिसत आहे.अनेक दुर्लक्षीत कामापैकी एक म्हणजे वाहतुकीचे रस्ते,जागोजागी पडलेले खड्डे,काही ठिकाणी लोखंडी सळ्या बाहेर आलेल्या आहेत.गवत सात परिसरात स्पीड ब्रेकर सारखी नाली असून



त्यावर टाकलेले लोखंडी ग्रीलचे बॉर्डर अँगल उंच आल्याने अपघातांना आमंत्रण असल्याचे दिसत आहे. शासनाकडून या गावाला तीर्थक्षेत्राचा 'ब' दर्जा प्राप्त असूनही लज्जास्पद परिस्थिती अशी की "रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते"?हा विचार आता सामान्य नागरिकांना पडला आहे.अनेक मार्गावर जसे कन्या शाळा रस्ता,सटवाई पुरा रस्ता,गुजरी बाजार,डोबान पुरा येथील रस्त्यांवर खड्डे निर्माण झाल्याने अक्षरशः बोजवारा उडाला आहे.त्या भागातील जुन्या काँक्रीट रस्त्यांवर खड्डे तर आहेतच,परंतु त्यांवरील वाळू, गिट्टी,डस्ट मिश्र स्वरूपात उखडल्याने धुळीचा प्रश्न निर्माण होत असून अपघातांची शक्यता नाकारता येत नाही. शासनाच्या वतीने जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण विकासासाठी निधी उपलब्ध करून दिल्या जातो पण त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे गावकऱ्यांकडून बोलले जात आहे.तात्पुरत्या स्वरूपात खड्डे बुजविण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

### शासनाच्या निधीचा नेमका वापर कुठे?

- **शासनाकडून विकासकामांसाठी मिळणाऱ्या निधीचा वापर रस्त्यावर होत नसल्याची चर्चा नागरिक करीत आहे."निधी येतोय,पण रस्ते मात्र दुर्लक्षित!मग पैसा जातो कुठे?" असा प्रश्न नागरिक ठामपणे विचारत आहे.तर ग्रामपंचायतीचा वाढीव स्वरूपाचा कर भरूनही नागरिकांना रस्त्यावरून चालणे कठीण झालेले आहे.**
- **निधी प्राप्त होताच शासनाला रस्ते संदर्भात प्रस्ताव पाठविण्यात येईल.काही रस्त्यांवर किरकोळ दुरुस्ती असल्यास ते करण्यात येईल.**
  **- सुरेश रेखाते**
  **ग्रामसेवक,ग्रा.पं. शि.कसबा**

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

## रेती तस्करीचा ट्रक पकडला

पांढरकवडा : अवैधरित्या रेतीची तस्करी तस्करी करणाऱ्या दोघांना ट्रकसह अटक करण्यात आली. तसेच त्यांच्याकडून एक ब्रास रेती व ट्रक असा एकूण ६ लाख ८ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई ३१ जानेवारी रोजी तेलंगटाकळी येथे करण्यात आली. महादेव सोनेराव दंडाजे (३१), निलेश बंडेवार (२८) रा. किन्ही नंदपूर ता. केळापूर असे अटकेतील आरोपी दोघांची नावे आहेत. संबंधित आरोपी हे आपल्या ट्रक क्रमांक एमएच ३२ ए ५०९८० मध्ये रेतीची विनापरवाना वाहतूक करताना मिळून आले. यावेळी संबंधित आरोपींकडे रेती वाहतुकीचा परवाना नसल्यामुळे मंडळ अधिकारी गोवर्धन दावडा यांनी कारवाई केली. तसेच या प्रकरणी पांढरकवडा पोलिसात रीतसर तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी संबंधित आरोपीं विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

**महत्त्वाचे**



## पुसद वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड. भारत जाधव तर सचिव पदी ॲड योगेश दिवेकर

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

पुसद : येथील पुसद वकील संघाच्या झालेल्यावर्ष २०२६ च्या निवडणूकीत अध्यक्ष पदी ॲड. भारत जाधव, उपाध्यक्षपदी ॲड. सुचिता नरवाडे (अविरोध) सचिव पदी ॲड. योगेश दिवेकर व कोषाध्यक्षपदी ॲड. अमोल भालेराव (अविरोध) यांची निवड झाली. वकील संघाच्या १८४ मतदारांपैकी १७८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. ॲड. भारत जाधव यांची तिसऱ्यांदा अध्यक्ष पदी निवड झाली आहे. पुसद वकील संघाच्या ११५ वर्षाच्या इतिहासात प्रथमच ॲड. भारत जाधव यांनी अध्यक्ष पदाची फळी. विजयी उमेदवारांवर अभिनदनाचा वर्षाव होत आहे

## तीरळे कुणबी समाज संघटनेच्या अध्यक्षपदी अशोक बेले तर सचिव पदी अक्षय कडू

**▸विदर्भ केसरी। पांढरकवडा-:**

दि. १ फेब्रुवारी रोजी श्रीराम मंदिर, पांढरकवडा येथे तालुका तीरळे कुणबी समाज संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. समाजातील विविध भागांतून पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत संघटनेच्या नव्या कार्यकारिणीची निवड एकमताने करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ समाज सेवक दिगांबर भोयर प्रमुख पावणे म्हूणन सल्लागार समिती चे अध्यक्ष प्रेमराव वखरे उपस्थित होते.सभेत वसंतराव पडोळे यांनी अशोक बेले यांचे अध्यक्षपदा करिता नाव सुचवले, चर्चेनंतर सर्वांच्या सहमतीने अशोक हरिभाऊ बेले यांची संघटनेच्या अध्यक्षपदी अविरोध निवड जाहीर करण्यात आली. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. तसेच उपाध्यक्षपदी वसंत भोंग, ग्रामीण उपाध्यक्षपदी प्रभाकर ठाकरे आणि सचिवपदी अक्षय बाबारावजी कडू यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित अध्यक्ष अशोक बेले यांनी आपल्या मनोगतात समाजातील ऐक्य आणि प्रगती यावर भर देत शैक्षणिक मदत, विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिरे, बेरोजगार युवकांसाठी प्रशिक्षण उपक्रम आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी योजना राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. संघटनेला अधिक मजबूत करण्यासाठी सर्व समाजबांधवांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले. बैठकीदरम्यान समाजातील विविध प्रश्नांवरही चर्चा करण्यात आली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा, शेतकरी कुटुंबांना मार्गदर्शन आणि सामाजिक ऐक्य वाढविण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन यासारख्या विषयांवर सकारात्मक चर्चा झाली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी नव्या कार्यकारिणीवर विश्वास व्यक्त करत संघटनेच्या माध्यमातून समाजहिताचे उपक्रम अधिक प्रभावीपणे राबवले जातील, असा आशावाद व्यक्त केला. वातावरण उत्साहपूर्ण आणि एकोप्याचे असल्याचे चित्र पाहायला मिळाले.निवड झाल्या नंतर सर्वांनी पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन केले. सदर बैठकीत तालुक्यातील समाज बांधव उपस्थित होते.

# सोशल मीडियावर संतापाचा 'विस्फोट'!

## तरुणाच्या 'अघोरी' पत्राला लाखो नेटिझन्सचा पाठिंबा; प्रशासकीय दिरंगाईचे वाभाडे

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

**प्रशासकीय अनास्थेचे 'भूत' उतरवण्यासाठी यवतमाळच्या एका तरुणाने घेतलेला अघोरी पवित्रा सध्या सोशल मीडियावर चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. हिवरा (संगम) येथील सामाजिक कार्यकर्ता हरीश भीमराव कामारकर याने थेट अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडे जादूटोण्याची परवानगी मागितल्याने खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, या अभिनव आंदोलनाला इंस्टाग्राम आणि फेसबुकवर लाखो नेटकऱ्यांनी पसंती दर्शवली असून, प्रशासनाविरुद्ध एक मोठे डिजिटल युद्ध छेडले गेले आहे.**




नागपूर-तुळजापूर या ५५१ किलोमीटरच्या भव्य महामार्गाचे काम सर्वत्र पूर्ण झाले असताना, केवळ हिवरा (संगम) येथील बायपासचे काम गेल्या अनेक दिवसांपासून रखडले आहे. या अपूर्ण कामामुळे गावाजवळ अपघातांचे सत्र सुरू झाले असून अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. वारंवार तक्रारी करूनही महामार्ग प्राधिकरण याकडे दुर्लक्ष करत असल्याने, हरीश कामारकर यांनी उपरोधाचा आधार घेतला. "जर विज्ञान आणि प्रशासन अपयशी ठरत असेल, तर आता भुताचा बंदोबस्त करण्यासाठी अघोरी मार्गच शिल्लक आहे," असे म्हणत त्यांनी १६ फेब्रुवारीच्या सोमवती अमावस्येला पूजेची परवानगी मागितली आहे.

हे पत्र सोशल मीडियावर पोस्ट होताच अवघ्या काही तासांत लाखो लोकांपर्यंत पोहोचले. इंस्टाग्रामवर या पत्राचे रील्स आणि फेसबुकवर पोस्ट प्रचंड व्हायरल झाल्या आहेत. नेटकऱ्यांनी "प्रशासनाच्या बधिरपणावर हाच योग्य उपाय आहे" अशा कमेंट्स करत हरीशच्या भूमिकेचे समर्थन केले आहे. अधिकाऱ्यांच्या अंगात शिरलेला 'आळस' उतरवण्यासाठी त्यांच्या फाईल्सवरून लिंबू उतरवण्याची जी अजब मागणी हरीशने केली आहे, त्यावर नेटकऱ्यांनी मिम्स आणि पोस्टद्वारे प्रशासनाचा जोरदार उपहास केला आहे.हरीश कामारकर यांच्या मते, महामार्ग प्राधिकरणाची यंत्रणा सध्या 'संमोहित' झाली आहे, ज्यांना लोकांचा आक्रोश आणि सांडणारे रक्त दिसत नाहीये. ही पूजा केवळ मांत्रिकाने नाही, तर जबाबदार अधिकाऱ्यांच्या हस्तेच पार पाडावी, जेणेकरून त्यांच्या कामातील अडथळे दूर होतील, असा टोलाही त्यांनी लगावला आहे.



**■ सोशल मीडियावरील या तुफान प्रतिसादाने आता प्रशासकीय यंत्रणेच्या नाकी नऊ आले आहेत. केवळ एका तरुणाचे पत्र म्हणून याकडे दुर्लक्ष करणाऱ्या यंत्रणेला आता लाखो लोकांच्या प्रश्नांना उत्तरे द्यावी लागणार आहेत. भविष्यात या ठिकाणी अपघात झाल्यास थेट महामार्ग प्राधिकरणावर गुन्हे दाखल करण्याचा इशाराही कामारकर यांनी दिला आहे. आता या 'डिजिटल' दबावानंतर तरी रखडलेला बायपास पूर्ण होणार की प्रशासन अजूनही कुंभकर्णी झोपेतच राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

## ६८ हजारांचा कॉपर केबल चोरी

यवतमाळ : शेतातील पिकांना पाणी देण्यासाठी लावलेल्या मोटारपंपाचा ६७ हजार ९५० रुपयांचा कॉपर केबल कुणीतरी अज्ञात चोरट्यांनी लंपास केला. ही घटना २ फेब्रुवारी रोजी वरुड शिवारात उघडकीस आली. विष्णू सोनबा काटपेल्लवार (६२) रा. जवळा ता. आर्णी असे फिर्यादीचे नाव आहे. घटनेनंतर त्यांनी वडगाव जंगल पोलीस ठाणे गाठून याप्रकरणी रीतसर तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## घामापूर येथून दुचाकी पळविली

उमरखेड : तालुक्यातील घामापुर येथून कुणीतरी अज्ञात चोरट्याने दुचाकी पळविली. ही घटना २९ जानेवारी रोजी रात्रीच्या सुमारास घडली. नितीन केशर राठोड (३३) रा. घामापूर (कुरळी) ता. उमरखेड असे फिर्यादीचे नाव आहे. घटनेनंतर त्यांनी दराटी पोलीस ठाणे गाठून एमएच २९ बीए ०३९३ क्रमांकाची दुचाकी चोरी गेल्याची रीतसर तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा अधिक तपास दराटी पोलीस करीत आहे.

# मुलीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी वडिलास अटक

**▸विदर्भ केसरी।यवतमाळ/वर्धा | प्रतिनिधी**

वर्धा जिल्ह्यातील सावंगी मेघे येथून एक हृदयद्रावक आणि धक्कादायक घटना समोर आली असून, मुलीला दीर्घकाळ मानसिक छळ करून आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरून वडील असलेल्या डॉक्टराविरुद्ध गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सावंगी मेघे पोलीस ठाण्यात FIR क्रमांक 0048/2026 नुसार भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 108 अंतर्गत आरोपी डॉ. अरुण उत्तम वानखेडे यांच्याविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

फिर्यादी डॉ. सौ. सुषमा अरुण वानखेडे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांची मुलगी कु. नक्षत्रा अरुण वानखेडे (वय 18) हिला वडील डॉ. अरुण वानखेडे यांनी सन 2021 पासून सातत्याने मानसिक छळ केला. विवाहबाह्य संबंधांबाबत जाब विचारल्यामुळे नक्षत्राला "तू माझी मुलगी नाहीस, तू पापाचे फळ आहेस, कलंक आहेस, तू मरून जा" अशा शब्दांत अपमानित करून त्रास दिला जात होता.



**■ सुसाईड नोट आणि धक्कादायक खुलासे**

दिनांक 26 जानेवारी 2026 रोजी नक्षत्राच्या स्टडी रूममध्ये सापडलेल्या रजिस्टरमध्ये इंग्रजी व मराठी भाषेत लिहिलेला मजकूर आढळून आला. त्यामध्ये वडिलांकडून रात्री खोलीत येऊन अश्लील कृत्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून, हे रजिस्टर पोलिसांकडे सादर करण्यात आले आहेत. हेलियम गॅसद्वारे आत्महत्या दिनांक 05 डिसेंबर 2025 च्या रात्री 11.30 ते 06 डिसेंबर 2025 सकाळी 7.00 या दरम्यान नक्षत्राने हेलियम गॅस सिलेंडर व प्लास्टिक पन्नीच्या साहाय्याने आत्महत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तिला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले मात्र डॉक्टरांनी मृत घोषित केले.

**■ पोलिसांची तात्काळ कारवाई**

या प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक वर्धा सौरभ अग्रवाल, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे, पीएसआय विशाल डोनेकर, पीएसआय सचिन कानडे यांनी उमरखेड (जि. यवतमाळ) येथून आरोपी डॉ. अरुण वानखेडे याला ताब्यात घेतले आहे.

**■ घटनेने समाज हादरला**

उच्चशिक्षित डॉक्टर कुटुंबातील ही घटना समाजाला हादरवणारी असून, मुलींवरील कौटुंबिक मानसिक अत्याचाराचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून, आरोपीविरोधात कठोर कारवाई होणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.

# धारधार शस्त्रासह सराईत दोन गुन्हेगार जेरबंद

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

शहरातील क्रीटीकेअर हॉस्पिटल परिसरात नागरिकांमध्ये चाकूच्या धाकावर दहशत निर्माण करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना अटक करण्यात आली आहे. ही कारवाई मंगळवारी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

गणेश सकट (२६), रा. नेताजी नगर, सागर चौधरी (४०), रा. मन्यायर ले आउट असे अटकेतील सराईत गुन्हेगारांची नावे आहेत. एलसीबीचे पथक अवधुतवाडी पोलीस स्टेशन परिसरात पेट्रोलिंग करीत होते. यावेळी पथकाला किटीकेअर हॉस्पिटल परिसरातील पाण्याच्या टाकीजवळ दोन तरुण हातात धारदार शस्त्रे घेऊन फिरत असून ते नागरिकांमध्ये दहशत निर्माण करीत आहे. अशी गोपनीय माहिती मिळाली. या माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पंचांसह घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर परिसरात सापळा रचून संशयित आरोपींना ताब्यात घेतले. यावेळी त्यांची अंगझडती घेतली असता, त्यांच्या जवळ दोन धारदार मोठे लोखंडी चाकू आढळून आले. याप्रकरणी पोलीस कर्मचारी सचिन घुगे यांच्या तक्रारीवरून अवधूत पोलिसांनी आरोपींवर आर्म्स ॲक्टसह कलमच्या कलमान्वये गुन्हे दाखल केले. ही कारवाई वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात सचिन घुगे, आशिष गुल्हाने, सुहास उईके, पवन भरके, योगेश डगवार, प्रशांत हेडाऊ यांनी केली.

# "गीत नया गाता हू " कार्यक्रम संपन्न .

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

दिनांक २ फेब्रुवारी रोजी डॉ. गायत्री फाउंडेशन यवतमाळ तर्फे अमृत सेलेब्रेशन हॉल , यवतमाळ येथे "गीत नया गाता हू " कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ प्रमोद यादगीरवार, प्रमुख अतिथी म्हणून यवतमाळ चे आमदार मा. बाळासाहेब मांगूळकर,मा. प्राचार्या डॉ सुप्रभा यादगीरवार, गायत्री काळे फाउंडेशन चे अध्यक्ष श्री सतीश काळे, प्रमुख वक्ते मा.प्राचार्य डॉ प्रशांत गावंडे उपस्थित होते. प्रास्ताविकातून डॉ . प्रशांत जिन्नेवार यांनी गायत्री फाउंडेशन चे अध्यक्ष श्री सतीश काळे यांचा कार्यक्रमाचा उद्देश स्व. डॉ. गायत्री च्या अकाली जाण्यामुळे तिच्या जन्मदिनी दुःखात न राहता तिचे समाजाप्रती असलेले स्वप्न पूर्ण करण्याचे हे एक नवे पाऊल आहे असे प्रतिपादन केले.या कार्यक्रमांतर्गत "वर्तमान शिक्षणात विद्यार्थ्यांची व पालकांची भूमिका " या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला . एकूण १०६ निबंध प्राप्त झाले यातील निबंधाचे मूल्यांकन ज्येष्ठ पत्रकार श्री पद्माकर मलकापूरे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या टीम मार्फत पूर्ण करण्यात आले. यामध्ये प्रथम पारितोषिक कु.रुपाली मधुकर धुळे, सावित्री ज्योतिराव समाजकार्य महाविद्यालय यवतमाळ ,द्वितीय पारितोषिक कु.अभिलाषा अभिषेक राजहंस,तृतीय पारितोषिक कु मनाली खरात तर प्रोत्साहनपर पारितोषिक नेर तालुक्यातील गौरी सुरेश गेडाम, रिया धनराज राठोड हिने पटकावले मान्यवरांच्या हस्ते त्यांना रोख रक्कम व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले. श्री सतीश काळे व मीना काळे यांनी पारधी समाजातील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी "आम्ही सावित्रीच्या लेकी आश्रयालय,वाघाडी येथील दोन मुलींना दत्तक घेऊन त्या सर्व ५३ मुलींच्या शिक्षणासाठी मदत म्हणून स्टॉल उभारून येणाऱ्या सर्व नागरिकांना मदतीचे आवाहन केले. तसेच त्या मुलींकरिता भोजनदान राशी भेट दिली.




वैद्यकीय क्षेत्रात विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी म्हणून वैद्यकीय शिक्षण MBBS पूर्ण केल्याबद्दल प्रातिनिधिक स्वरूपात डॉ. आचल चंद्रकांत कोरडे हिला शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांचे हस्ते गौरविण्यात आले. याप्रसंगी मा. प्राचार्य डॉ प्रशांत गावंडे यांनी "जेथे जातो तेथे तू माझा सांगाती " या शीर्षकाखाली कुटुंब व सदस्यांवर परिणाम होणारे घटक विस्तृत पणे मांडले. प्रमुख अतिथी प्राचार्य सुप्रभा यादगीरवार यांनी मानवी जीवनात आनंदी राहण्यासाठी कोणत्या प्रकारची जीवनपद्धती अविलंबविली पाहिजे हे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ यादगीरवार यांनी प्रात्यक्षिक जीवन पद्धती योग,ध्यान व आनंदी जीवन जगण्याकरिता आर्ट ऑफ लिव्हिंग मधील सर्व कोर्सेस ची माहिती दिली. या कार्यक्रमात पारधी समाजातील मुलींना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी मुलींना दत्तक घेण्याची तयारी दर्शविली व त्यांना आर्थिक मदत केली .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री कैलास राऊत यांनी तर आभार प्रदर्शन श्री ज्ञानेश्वर गायकवाड यांनी केले.

# परीक्षा काळात मोबाईल पासून दूर रहा:प्रा.सैय्यद सलमान

## वसंतराव नाईक कनिष्ठ महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न

**▸विदर्भ केसरी। विजय निखाते**

**पुसद :** वसंतनगर येथील युवक मंडळाद्वारे संचालित वसंतराव नाईक कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य कु. वंदना पोले उपस्थित होत्या.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून फुलशील नाईक महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. वैभव पाटील, तर प्रमुख वक्ते म्हणून मराठी संत साहित्याचे गाढे अभ्यासक व विद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रा. सैय्यद सलमान सय्यद शेरू हे उपस्थित होते. तसेच व्यासपीठावर क्रीडा विभाग प्रमुख बाळासाहेब कराळे,माजी कार्यक्रमाधिकारी प्रा. नरेश राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.




प्रमुख वक्ते प्रा.सैय्यद सलमान यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, मोबाईल फोन पासून स्वतःला दूर ठेवा नैतिक मूल्य पाळा "शिक्षकांचा सन्मान करा, कारण शिक्षक हेच तुमच्या आयुष्याचा पाया घडवतात. जे विद्यार्थी शिक्षकांचा आदर करतात, त्यांचा सन्मान भविष्यकाळ आपोआप करतो." ते पुढे म्हणाले की, केवळ गुण मिळवणे महत्त्वाचे नसून मूल्याधिष्ठित जीवन जगणे, परिश्रम,प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकी यांची जोपासना करणे आवश्यक आहे.

संतांच्या विचारांतून जीवनाला दिशा मिळते आणि त्या विचारांचा स्वीकार केल्यास यश निश्चित मिळते,असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य कु.वंदना पोले यांनी ज्ञान हीच खरी शिदोरी असून तिच्या बळावर विद्यार्थ्यांना यशाचा मार्ग सुकर करता येतो, असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचाल करावी, असा सल्लाही त्यांनी दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. शेषराव राठोड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रश्मी डेकाटे यांनी तर आभार प्रदर्शन क्रीडा विभाग प्रमुख बाळासाहेब कराळे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राजेश बुरबुरे, अविनाश राठोड, संजय राठोड, अभिजीत राठोड, विजय राठोड, विष्णू इंगळे, भूमेश्वर डोक, महेश चव्हाण, पांडुरंग जाधव, अमोल राठोड, युवराज जाधव आदींनी अथक परिश्रम घेतले.

# रुग्णांच्या वेदना झाकण्यासाठी बनावट अहवाल?

## गुरुदेवची अधिष्ठात्यांवर कारवाईची मागणी : शासकीय रुग्णालय समस्यांचे माहेरघर; गुरुदेव युवा संघाचा थेट हल्ला

**▸विदर्भ केसरी।यवतमाळ :**

श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ येथील गंभीर समस्या झाकण्यासाठी अधिष्ठात्यांनी जाणीवपूर्वक चुकीचा व खोटा अहवाल सादर केल्याचा गंभीर आरोप गुरुदेव युवा संघाने केला आहे. या प्रकरणी संबंधित अधिष्ठात्यांवर तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करून निलंबनाची कारवाई करावी, अशी ठोस मागणी संघाच्या वतीने मुख्यमंत्री सचिवालय, वैद्यकीय मंत्री व संबंधित वरिष्ठ यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



गुरुदेव युवा संघाच्या म्हणण्यानुसार, रुग्णालयातील अस्वच्छता, स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था, रक्तपेढीमधून गोरगरीब रुग्णांना रक्त देण्यास टाळाटाळ, कर्मचाऱ्यांची उर्मट वागणूक, दिव्यांगांसाठी व्हीलचेअर व यूआयडी केंद्राचा अभाव, २४ तास औषधांची अनुपलब्धता, पिण्याच्या पाण्याची गैरसोय तसेच किरकोळ भांडारात लाखो रुपयांचा कथित भ्रष्टाचार या समस्या वारंवार निदर्शनास आणूनही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही. या गंभीर तक्रारींची दखल घेत वैद्यकीय मंत्री यांनी अधिष्ठात्यांना चौकशीचे आदेश देणारे पत्र पाठवले होते. मात्र प्रत्यक्ष चौकशी न करता केवळ कागदावर समिती गठीत करून खोटा व दिशाभूल करणारा अहवाल संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन (DMER) यांच्याकडे पाठवण्यात आल्याचा आरोप गुरुदेव युवा संघाने केला आहे. त्यामुळे शासनाला प्रत्यक्ष परिस्थितीपासून अनभिज्ञ ठेवून रुग्णांच्या यातना लपवण्यात आल्या, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे. यवतमाळ शासकीय रुग्णालयात रुग्णांना औषधे वेळेवर मिळत नाहीत, स्ट्रेचरची कमतरता आहे, रुग्णांच्या नातेवाईकांसाठी निवासाची कोणतीही व्यवस्था नाही. थंडीच्या दिवसांत नातेवाईकांना उघड्यावर राहावे लागत असल्याची विदारक परिस्थिती असून दिव्यांग रुग्णांसाठी यूआयडी केंद्र रुग्णालयातच सुरू करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

तसेच रुग्णांच्या नातेवाईकांसाठी धर्मशाळा उभारण्याचीही आवश्यकता व्यक्त करण्यात आली आहे. या प्रकरणी गुरुदेव युवा संघाने स्पष्ट भूमिका घेतली असून, खोटा अहवाल सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर खातेनिहाय चौकशी, निलंबन, फौजदारी कारवाई तसेच दोषी आढळल्यास शिक्षेची मागणी करण्यात आली आहे. गरज पडल्यास उच्च न्यायालयात याचिका दाखल करून न्यायालयीन अवमानाची कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

निवेदन सादर करताना गुरुदेव युवा संघाचे अध्यक्ष मनोज गेडाम, सामाजिक कार्यकर्ता संतोष मनोहर, रुग्णसेवक संघपाल बारसे यांच्यासह संघाचे कार्यकर्ते उपस्थित होते. "यवतमाळच्या गोरगरीब रुग्णांना न्याय मिळेपर्यंत गुरुदेवचा लढा थांबणार नाही," अशी ठाम भूमिका संघाने मांडली आहे.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणारा युवक पोलिसांच्या ताब्यात

**▸विदर्भ केसरी।पांढरकवडा -:**

लग्नाचे आमिष दाखवून एका अल्पवयीन मुलीवर दीड वर्षापासून लैंगिक अत्याचार करणाऱ्या युवकाला पांढरकवडा पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता, पोक्सो, आणि ॲट्रॉसिटी ॲक्ट कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलगी ही पांढरकवडा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील एका गावात आपल्या कुटुंबासह राहते. पीडितेची आणि आरोपी किरण हुसेन बोरकर (वय २० वर्षे, रा.पांढरकवडा) याची जुलै २०२४ पासून ओळख होती. या ओळखीचा फायदा घेऊन आरोपीने पीडितेच्या घरी किंवा स्वतःच्या घरी कोणी नसतांना "आपण लग्न करू असे आमिष दाखवून पीडितेवर वारंवार शारीरिक अत्याचार केले, हा प्रकार गेल्या दीड वर्षापासून सुरू होता. मात्र, दि. २९ जानेवारी २०२६ रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास आरोपीने मद्यधुंद अवस्थेत पीडितेशी वाद घालून तिला मारहाण केली. या त्रासाला कंटाळून अखेर पीडितेने ३० जानेवारी रोजी पोलीस स्टेशन गाठून तक्रार दिली. पीडितेच्या तक्रारीवरून पांढरकवडा पोलिसांनी आरोपी किरण बोरकर विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलीस प्रशासनाने तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. तांत्रिक आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास पथकाने आरोपीचा शोध घेऊन त्याला काही तासांतच ताब्यात घेतले, सदरची कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबीन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पांढरकवड़ा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक एल. डी. तावरे यांच्या सूचनेनुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर पेंढारकर व पोलीस शिपाई विकेश ध्यावर्तीवार यांनी ही यशस्वी कारवाई केली.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
बुधवार, ४ फेब्रुवारी २०२६ | ४
GOOD MORNING
अकोला+वाशिम
!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

# बोगस फॅक्टरी सील

▸विदर्भ केसरी। यवतमाळ



यवतमाळ,दि.३ फेब्रुवारी यवतमाळ जिल्ह्यात नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ करणाऱ्या घटनांची मालिका सुरू असतानाच,लोहारा MIDC परिसरात आज पुन्हा एकदा गंभीर व धक्कादायक प्रकार उघडकीस आला.लोहारा MIDC येथील प्लॉट क्रमांक बी–४५,ॲडिशनल एरिया,लोहारा,यवतमाळ येथे असलेल्या सवाई सिंग राज पुरोहित यांच्या मालकीच्या श्री.डी.के.बेकरी अँड नमकिन या फॅक्टरीमध्ये सुरू असलेला बोगस व भेसळयुक्त खवा-पेढा तयार करण्याचा घोटाळा काल दिनांक २ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ ते ६ वाजताच्या सुमारास उघडकीस आला.सोशल मीडिया कॉंग्रेस कमिटी यवतमाळ जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके,कॉम्रेड सचिन मनवर व शेतकरी चळवळीचे कार्यकर्ते प्रा.पंढरी पाठे यांनी या प्रकरणाची दखल घेताच प्रशासन हालचालीत आले आणि फॅक्टरीवर तात्काळ कारवाई करण्यात आली.

घटनेची माहिती मिळताच कृष्णा पुसनाके,सचिन मनवर व प्रा. पंढरी पाठे यांनी सहआयुक्त अन्न प्रशासन,यवतमाळचे महाजन साहेब यांना घटनास्थळी पोहोचून भ्रमणध्वनीद्वारे सविस्तर माहिती दिली.वरिष्ठ स्तरावरून तात्काळ दखल घेतल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने तातडीने पावले उचलली.त्यानुसार FDA चे अन्न सुरक्षा अधिकारी अमितकुमार उपलप यांनी प्रत्यक्ष फॅक्टरीत जाऊन सखोल तपासणी व इन्व्हेस्टिगेशन केले. तपासणीदरम्यान अंदाजे ५० ते ७० हजार रुपये किमतीचा बोगस व भेसळयुक्त खवा व पेढा आढळून आला.अन्न सुरक्षा व मानके नियमांचे गंभीर उल्लंघन झाल्याचे स्पष्ट होताच संबंधित फॅक्टरी तात्काळ सील करण्यात आली.यावेळी लोहारा पोलीस स्टेशनचे ठाणेदार रोहित चौधरी यांचीही उपस्थिती होती. तपासादरम्यान आणखी धक्कादायक बाबी समोर आल्या असून,या फॅक्टरीमध्ये एकूण चार कामगार कार्यरत असल्याचे आढळून आले. हे सर्व कामगार राजस्थानचे रहिवासी असून,त्यापैकी दोन मुलांचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असल्याची प्राथमिक माहिती आहे.तसेच फॅक्टरीचा मालक तयार केलेला बोगस खवा-पेढा गुजरातमधील कन्हैया कंपनीच्या पॅकेजिंग मटेरियलमध्ये पॅक करून बाजारात विक्री करत असल्याचे उघड झाले आहे.विशेष म्हणजे हा बोगस माल गेल्या एक ते दोन वर्षांपासून यवतमाळमध्येच तयार केला जात होता. या फॅक्टरीकडे कोणत्याही प्रकारचा वैध परवाना नसल्याचे अन्न सुरक्षा अधिकारी अमितकुमार उपलप यांनी स्पष्ट केले आहे.

**■ यवतमाळ जिल्ह्यात अलीकडे आरोग्याशी संबंधित अनेक गंभीर प्रकार घडत असताना,हा नवा घोटाळा म्हणजे नागरिकांचे आरोग्य कुठल्याही प्रकारे सुरक्षित नसल्याचे भयावह वास्तव पुन्हा एकदा समोर आणणारा आहे. केवळ नफ्यासाठी जनतेच्या जीवाशी खेळ करणाऱ्या भेसळखोरांवर कठोरात कठोर कारवाई व्हावी,अशी जोरदार मागणी होत आहे.बोगस खवा-पेढा घोटाळा उघडकीस आणून सार्वजनिक आरोग्याच्या रक्षणासाठी ठाम भूमिका घेणाऱ्या कृष्णा पुसनाके,कॉम्रेड सचिन मनवर व प्रा.पंढरी पाठे यांच्या धाडसी पुढाकाराचे सर्वत्र स्वागत होत असून,अन्न भेसळीविरोधातील लढ्याला यामुळे मोठे बळ मिळाले आहे.**

## महत्त्वाचे

### ठगी प्रकरणाबाबत ठगी पीडित परिवार तपजप संघटनेचे तहसीलदारांना निवेदन

▸विदर्भ केसरी।कुही | प्रतिनिधी



आज दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी ढगी पिढीत परिवार तपजप संघटना, मांढळ यांच्या वतीने माननीय तहसीलदार साहेब, कुही यांना ठगी प्रकरणांबाबत निवेदन सादर करण्यात आले. निवेदनामध्ये ठगीमध्ये सहभागी असलेल्या संबंधित अधिकारी व दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. तसेच अनियमित ठेवी योजना प्रतिबंधक अधिनियम २०१९ या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी व ठगीस बळी पडलेल्या ठेवीदार पिढीतांना ठेवी परतावा कायद्यानुसार तात्काळ परतावा देण्यात यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. निवेदन सादर करतेवेळी वेलतूर सर्कलच्या पिंकीताई रोडगे, उत्तम काकडे, मनोहर लोखंडे, यांच्यासह तालुक्यातील अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी ठगीग्रस्त पिढीतांना न्याय देण्याची ठाम भूमिका मांडली. माननीय तहसीलदार साहेबांनी निवेदन स्वीकारून ठगी प्रकरणाची गंभीर दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

### ग्रामीण भागातील विद्यार्थीही तितकेच हुशार आहेत : ठाणेदार अजित जाधव.

▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर प्रतिनिधी.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही प्रचंड गुणवत्ता असून हुशारच्या बाबतीत ते शहरातील विद्यार्थ्यांपेक्षा कमी नाहीत, असे प्रतिपादन ठाणेदार अजित जाधव यांनी केले. दारूल उलुम संस्था व इमाम वलीउल्लाह पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेजद्वारा आयोजित बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या बोर्ड प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करतांना सांगितले की, योग्य मार्गदर्शन, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर ग्रामीण भागातील विद्यार्थीही कोणतेही शिखर गाठू शकतात.
शिक्षण हे समाजबदलाचे प्रभावी साधन असून विद्यार्थ्यांनी शिस्त, नैतिकता आणि कर्तव्यभावनेतून पुढे जावे, असे आवाहनही त्यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष मौलाना मुफ्ती रोशन शाह कासमी यांनी ठाणेदार अजित जाधव यांचे शाल व पुष्पमाला स्वागत केले तसेच ठाणेदार अजित जाधव यांनी संपूर्ण संस्थेची पाहणी करून कौतुक केले कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ता शे इमरान शेख खालील, मौली अशरफ उपस्थित होते.

### सौ. संध्या डाहेलकर यांना डॉ. सिंधुताई सपकाळ सन्मान

▸विदर्भ केसरी। मुर्तिजापुर :

श्रीसंत गाडगेबाबा यांच्या दससुत्री संदेशांना आपले उदिष्ट मानून कार्य



करणाऱ्या संत गाडगेबाबा कर्मभूमी सेवा प्रतिष्ठान च्या ध्येय धोरणाने प्रेरित होऊन संस्थेच्या उपक्रमांतर्गत तहानलेल्यांना पाणि आणि भुकेल्या्ना अन्न या बाबांच्या संदेशानुसार भुके दीन दुबळे , गरिब गरजू अंध पंगूंना सदावर्ताप्रमाने दर आलेल्यांना दररोज निशुल्क भोजन देणाऱ्या सौ़ संध्या अनिल डाहेलकर यांच्या सेवाव्रताची दखल म्हणून त्यांचा डॉ. शिंधुताई सपकाळ नारी प्रेरणा पुरस्काराने संमानाने कानशिवनी येथे गौरविण्यात आले. कलाविष्कार साहित्य , सांस्कृतिक संसथेच्या वतीने आयोजित तिसऱ्या राज्यस्तरीय साहित्य संम्मेलनाच्या डॉ. प्रा. संतोष हुशे यांच्या संमेलनाध्य म्हमून कानशिवनी च्या एकलव्य स्कुल च्या प्रागणात पार पडलेल्या या संमेलनात गाणसामरखगणी लता ़मगेशकर पुरस्कार प्राप्त गझलनवाज पं. भिमराव पांजाळे यांच्या हस्ते तसेच मान्यवरांच्या उपस्तित डॉ. शिधुताई सपकाळ नारी प्रेरणा पुरस्कार देवून सौ. संध्या अनिल डाहेलकर यांचा गौरव करण्यात आला. सौ. संध्या डाहेलकर या गेल्या तिन चार वर्षा आधी पासून मेस द्वारे विद्यार्थी विद्यार्थ्यांना अल्प दरात टिफिन सेवा आणि आता या वर्षी पासून भरपेट बसून शिवाश्रय मेस हाटेल च्या माध्यमातून रुचकर जेवन देत सोबत गरिब गरजूं दीन दुबळ्यांना आनंदाने जेवू घालत आहेत.

# विजयानंद देवतळे पुरस्काराने सन्मानित



▸विदर्भ केसरी। यवतमाळ

सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा वेगळा ठसा उमटवणारे, माजी मंत्री अँड. शिवाजीराव मोघे यांचे निकटवर्तीय व अधिकृत स्वीय सहाय्यक विजयानंद चक्रधर देवतळे यांना प्रतिष्ठेचा 'महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. ठाणे येथील 'एशियन युथ इमेज कॉन्फरन्स आणि अवॉर्ड सेरेमनी'मध्ये त्यांना या बहुमानाने गौरविण्यात आले.

विजयानंद देवतळे हे गेल्या अनेक वर्षांपासून माजी मंत्री ॲड. शिवाजीराव मोघे यांचे विश्वासू सहकारी आणि स्वीय सहाय्यक म्हणून कार्यरत आहेत. या जबाबदारीच्या माध्यमातून त्यांनी केवळ राजकीय प्रशासनच हाताळले नाही, तर सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतला आहे. शिक्षण, कला, साहित्य आणि विशेषतः तळागाळातील लोकांच्या सामाजिक समस्या सोडवण्यात त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. त्यांच्या याच निस्वार्थ सेवेची दखल घेत 'इमेज इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड्स' तर्फे त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

ठाण्यातील मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या रेगे सभागृहात दिनांक १ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून मुंबईच्या ख्यातनाम समाजसेविका सौ. मानसी परब-राणे, महाराष्ट्र शासनाचे नागरी संरक्षण उपनियंत्रक विजय जाधव, ज्येष्ठ साहित्यिक मा. डॉ. भूपेंद्र संख्ये आणि समाजसेवक भरत खांडेकर, सचिन भवरे आदी मान्यवर उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते देवतळे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्रसिद्ध अभिनेते दीपक जोशी यांनीही देवतळे यांच्या कार्याचा गौरव केला.

या दिमाखदार सोहळ्याचे आयोजन समृद्धी पब्लिकेशनचे संचालक डॉ. बी. एन. खरात यांनी केले होते. निमंत्रक डॉ. पी. टी. कांबळे व आर. एस. जाधव यांच्यासह समन्वय समितीचे सदस्य सौ. श्वेता शिर्के, राम राणे आणि सुरज पवार यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. विजयानंद देवतळे यांना मिळालेल्या या पुरस्कारामुळे त्यांच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. "हा पुरस्कार माझ्या आजवरच्या कामाची पोचपावती असून भविष्यातही जनसेवेचे हे व्रत सुरूच राहील," अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

## 'सीईओ' मंदार पत्की यांची मावळणी गावाला भेट



▸विदर्भ केसरी। कळंब

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राजतर्फे यवतमाळ जिल्ह्याचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांनी मावळणी गावाला नुकतीच भेट देऊन समाधान व्यक्त केले व गावकर्!यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांच्यासोबत गटविकास अधिकारी युवराज मेहत्रे, भूपेन्द्र बाहेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे वृक्षारोपण केले. अंगणवाडी व जिवनधारा ग्राम संघाची पाहणी केली. प्लॅस्टिक संकलन केंद्राचे उद्घाटन तसेच अरुणोदय सिकलसेल, ॲनिमिया तपासणी शिबिराचे उद्घाटन केले. यावेळी प्रफुल्ल ठेगेंकर वायगोकर तालुका आरोग्य अधिकारी घोरसरे, सायली देशमुख, तसेच संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. विविध योजनांचा आढावासुद्धा त्यांनी या भेटीत घेतला. नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

## फन फिट मॅराथॉनमध्ये चिमुकल्यांपासून ७० वर्षांवरील नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

▸विदर्भ केसरी। आर्णी | प्रतिनिधी : बबिता शिवणकर



गिरिज किड्झी, आर्णी यांच्या वतीने आज रविवारी सकाळी सहा वाजता भव्य फन फिट मॅराथॉनचे आयोजन करण्यात आले. सलग दुसऱ्या वर्षी घेण्यात आलेल्या या मॅराथॉनला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या मॅराथॉनमध्ये आर्णी शहरासह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या विविध वयोगटातील शेकडो धावपटूंनी सहभाग नोंदवला. १० वर्षांच्या चिमुकल्यांपासून ते ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटातील धावपटू सहभागी झाले होते. अनेक नागरिकांनी आपल्या कुटुंबासह मॅराथॉनमध्ये सहभाग घेत आरोग्याबाबत सकारात्मक संदेश दिला.

या उपक्रमात नाशिक, नंदूरबार, यवतमाळ, पुसद, उमरखेड, नागपूर, अकोला, वरोरा आणि अमरावती येथील धावपटू सहभागी झाले होते. मॅराथॉनपूर्वी धावपटूंच्या वॉर्मअपसाठी आयोजकांच्या वतीने झुंबा सत्राचेही आयोजन करण्यात आले होते. मॅराथॉन यशस्वीरीत्या पार पडल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते विजेत्या व सहभागी धावपटूंना सन्मानचिन्हे व बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

यावेळी गिरिज किड्झी शाळेच्या मुख्याध्यापिका सोनाली गिरी, सोमय्या चक्रवर्ती, रोहित पेड्डूलवार, बंटी गुप्ता, डॉ. शाम गुटे, इंजि. सागर घोडेराव, अभिजीत गिरी, दीपक शहाणे, राजेश माहेश्वरी, राजू इंगोले, हरिओम बघेल, अमोल देशमुख, संदीप अंदूरे आदी मान्यवर उपस्थित होते. या मॅराथॉनच्या माध्यमातून आरोग्य, तंदुरुस्ती आणि कुटुंबीयांसोबत व्यायामाचे महत्त्व अधोरेखित झाले असून नागरिकांकडून आयोजकांचे कौतुक करण्यात आले.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट्या ठार

▸विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर



बाळापूर : बाळापूर वाडेगाव मार्गावर अज्ञात वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत एका बिबट्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना सोमवारी (ता. २) रोजी सकाळी उघडकीस आली. ही मादी बिबट असून तिचे वय साधारण दोन ते अडीच वर्षे असल्याची माहिती वनविभागाने दिली आहे. बाळापूर-वाडेगाव रस्त्यावर एक बिबट अपघातात ठार झाल्याची घटना उघडकीस आली. रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना रस्त्याच्या कडेला बिबट्या मृतावस्थेत आढळून आला. अकोला वनविभागाला या घटनेची माहिती मिळताच त्यांनी तातडीने सूत्रे हलवली. उपवनसंरक्षक सुमंत सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक वनसंरक्षक पवन जाधव व आर.एफ.ओ. विश्वास थोरात यांच्या आदेशानुसार वनविभागाचे पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले.

या पथकात वनपाल गजानन गायकवाड, मानद वन्यजीव रक्षक बाळ काळणे, वनरक्षक एन.एन. सावळे, राम काकडे, यशपाल इंगोले आणि तुषार अवारे यांचा समावेश होता. वनविभागाने पंचनामा करून पुढील कार्यवाही सुरू केली आहे. या परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर असल्याचे वनविभागाच्या निदर्शनास आले होते.

त्याअनुषंगाने अकोला वनविभागाने प्रसारमाध्यमांद्वारे आणि प्रत्यक्ष गावागावांत जाऊन नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले होते. मात्र, रस्ते ओलांडताना वन्यजीवांना वेगाचा अंदाज येत नसल्याने असे अपघात घडत आहेत.

## समृद्धी महामार्ग गोवंश तस्करीचा हब

▸विदर्भ केसरी। वाशीम :-

मंगळवारी सकाळी चार चाकी पिकप एम एच ४९ बिल झेड ५०५८ या वाहनाने काही मृत तर काही गोवंश यांना कोंबुन अशा एकुण चौदा गोवंश समृद्धी महामार्गावर कत्तली करीता जात असल्याचे बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी गोवंशाची तस्करी उघडकीस केली व काही गाईंना जीवदान दिले याबाबत सर्वच स्तरातून त्यांना शाबासकी दिली जात आहे

सदर गोवंश पोलीस स्टेशन मंगरूळनाथ च्या माध्यमातून चैतन्य गोशाळा, वाशिम यांना सुपूर्द करण्यात आल्या मंगरूळनाथ, मानोरा, वाशिम, कारंजा, संपूर्ण वाशिम जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात गोवंश तस्करी होत असून गोवंशाची कत्तल सर्रास सुरू आहे मुख्य चौकातील कॅमेरे बंद आहे याप्रसंगी प्रशासनाने लक्ष घालून आरोपींवर कठोर कारवाई करावी तसेच आजच्या



गाडीचा पाठलाग करून गोवंशाला जीवदान दिले तसेच या कार्यवाही मध्ये नाथ नगरीतील गो भक्त कारंजा, मानोरा, येथील गोभक्त व बजरंग दलाच्या समस्त कार्यकर्त्यांनी पोलिस प्रशासनास कठोर कारवाई ची मागणी केली, जर कार्यवाही केल्या गेली नाही तर यापुढे आम्ही आमच्या पद्धतीने दंड कार्यवाही मध्ये सामील असलेल्या सर्व कसाई टोळीला अटक करून ताबडतोब कठोरात कठोर कारवाई करावी अशी विनंती गो भक्तांनी केली. याप्रसंगी महेश इंगळे, प्रथमेश सुळे विनोद वानखेडे, ज्ञानेश्वर परांडे, गोविंद नवघरे, महादेव मुठाळ व सोबत रुक्मिणी माऊली यांनी संबंधित देऊ व आंदोलनात्मक पवित्रा घेतला जाईल असा इशारा देण्यात आला. या प्रसंगी पोलीस स्टेशन येथे त्वरित हजर होऊन पशु चिकित्सक डॉ. सागर सोनटक्के, डॉ.जानराव पहुरकर, डॉ. पल्लवी जाधव यांनी जखमी गोवंशाची सेवा केली त्याबद्दल केशव गोरक्षण च्या वतीने आभार मानले

# दर्यापुरात मृत शेतकऱ्यांच्या अनुदानावर घाला!

## वारस हक्क डावलून सरकारी मदत परस्पर वळवण्याचा प्रकार : ढिसाळ कारभारामुळे 'मृतांच्या टाळूवरचे लोणी' खाण्याचा आरोप

▸विदर्भ केसरी। दर्यापूर (विशेष प्रतिनिधी):

तालुक्यात निसर्गाच्या अवकृपेने होरपळलेल्या शेतकरी कुटुंबांवर आता प्रशासकीय अन्यायाची कुऱ्हाड कोसळताना दिसत आहे. कुटुंबातील कर्ता पुरुष व जमिनीचा मूळ खातेदार मृत झाल्यानंतर, त्यांच्या नावावर मंजूर होणारे नापिकी, पीकविमा किंवा इतर शासकीय अनुदान कायदेशीर वारसांची संमती न घेता परस्पर दुसऱ्याच सदस्याच्या खात्यात जमा केल्याचे गंभीर प्रकार दर्यापूर तालुक्यात उघडकीस आले आहेत. या प्रकारामुळे खऱ्या वारसांचा हक्क हिरावला जात असून प्रशासनाच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. तालुक्यातील अनेक गावांत सामूहिक शेतीची पद्धत आहे. सातबारावर नाव असलेल्या खातेदाराचा मृत्यू झाल्यानंतर नियमानुसार सर्व कायदेशीर वारस हे त्या जमिनीचे तसेच त्यावरील शासकीय लाभाचे वाटेकरी ठरतात. मात्र प्रत्यक्षात, महसूल व कृषी विभागातील काही कर्मचाऱ्यांच्या संगनमताने वारस नोंद न करता, तसेच इतर वारसांचे 'न हरकत प्रमाणपत्र' (NOC) किंवा सामाईक संमतीपत्र न घेता अनुदान एका सदस्याच्या खात्यात वळते केल्याचा आरोप पुढे आला आहे. या प्रकरणात केवळ नियमभंग नव्हे,



तर जाणीवपूर्वक दुर्लक्ष आणि 'अर्थपूर्ण तडजोड' केल्याचा संशय बळावत आहे. संबंधित अधिकारी अनुदान वितरण करताना मूलभूत कागदपत्रांची पडताळणी न करता व्यवहार करत असल्याने हा प्रकार घडल्याचे बोलले जात आहे.

**■ नियम काय सांगतो?**

शासकीय नियमांनुसार- वारस नोंद अनिवार्यः खातेदाराचा मृत्यू झाल्यानंतर सर्वप्रथम सातबारावर सर्व कायदेशीर वारसांची नावे नोंदवणे आवश्यक. सामाईक संमतीपत्र बंधनकारकः वारस नोंद पूर्ण न झाल्यास, सर्व वारसांनी एका सदस्याच्या नावे सामाईक संमतीपत्र (Indemnity Bond) देणे गरजेचे.बँक व्यवहारांची अटः मृत व्यक्तीच्या नावावरील अनुदानाची रक्कम केवळ सर्व वारसांच्या संयुक्त खात्यात किंवा संमती असलेल्या वारसाच्या खात्यातच जमा करता येते. या नियमांचे सर्रास उल्लंघन करून अनुदान वाटप केल्यास तो प्रकार फसवणूक व सरकारी निधीचा अपहार या श्रेणीत येतो.

### नियमांना बगल, जबाबदारी टाळण्याचा प्रकार

**■ शासकीय मार्गदर्शक सूचनांनुसार, खातेदार मृत असल्यास अनुदान वाटपापूर्वी स्पष्ट प्रक्रिया पाळणे बंधनकारक आहे. मात्र दर्यापुरात ही संपूर्ण प्रक्रिया डावलली जात असल्याचे वास्तव समोर आले आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडून केवळ एका नातेवाईकाशी 'अर्थपूर्ण' तडजोड करून अनुदान वितरित केल्याचा आरोप पीडित वारसांकडून केला जात आहे.**

# जनगणनेतून ओबीसी गायब करण्याचा डाव

▸विदर्भ केसरी। यवतमाळ

जनगणनेतून ओबीसी गायब करण्याचा डाव; केंद्राने वेळीच सुधारणा न केल्यास देशभर जनजागृती अभियान आंदोलन करणार, असा ईशारा 'सकल ओबीसी जनमोर्चा, ओबीसी क्रांती दल, भारतीय पिछडा शोषित संघटनेचा केंद्र सरकारला जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मंगळवारी (ता.३) दिलेल्या निवेदनातून दिला आहे.

केंद्र सरकारने २०२७ च्या जनगणनेतून ओबीसी प्रवर्ग जाणीवपूर्वक वगळला आहे. २२ जानेवारी रोजी जनगणना आयुक्तांकडून प्रसिद्ध झालेल्या राजपत्रात ओबीसीचा स्वतंत्र उल्लेख टाळला गेला आहे. केंद्र सरकारच्या या ओबीसीविरोधी भूमिकेविरोधात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि जनगणना आयुक्तांना पत्राद्वारे तीव्र निषेध कळविण्यात आला आहे. 2027 च्या जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात घर सूची अर्जातील प्रश्न क्रमांक 12 मध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी स्वतंत्र रकाने कॉलम देण्यात आले आहे, मात्र देशातील बहुसंख्या असलेल्या ओबीसी समाजाला जाणीवपूर्वक इतर या वर्गवारी ढकलण्यात आले हा प्रकार ओबीसी समाजाच्या घटनात्मक अस्तित्वावर घाला घालणार असून समाजाची फसवणूक करणार आहे .त्यामुळे केंद्र सरकारने तात्काळ यासंदर्भात निर्णय घ्यावा अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. याप्रसंगी डॉ. ज्ञानेश्वर गोरे, डॉ. विलास काळे, डी. आर. बोरगावकर ,मंगेश शिरभाते, विजय निवल, मायाताई गोरे ,अनिल जिपकाटे ,कैलास हुमणे ,अशोक तिखे, ए.व्ही. सर्वदे ,मनोज पाचघरे ,अमन निर्वाण आदींची उपस्थिती होती.

दैनिक विदर्भाचा मानबिंदू
विदर्भ केसरी TODAY



GOOD MORNING

## पुणे शहरात चोरट्यांचा धुमाकूळ:कोथरूड, भवानी पेठ, शिवणे, हडपसरमध्ये घरफोडी

पुणे : शहरात घरफोडी करणाऱ्या चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. कोथरूड, भवानी पेठ, शिवणे आणि हडपसरमधील महंमदवाडी या चार भागांत चोरट्यांनी सदनिकांचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने आणि रोकड असा एकूण ११ लाख रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. भवानी पेठेतील गुरुनानकनगर भागात भरदिवसा घरफोडी झाली. एका व्यावसायिकाच्या सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी चार लाख ९५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने आणि रोकड चोरली. तक्रारदार व्यावसायिक २ फेब्रुवारी रोजी सकाळी अकराच्या सुमारास कुटुंबीयांसह सदनिका बंद करून बाहेर गेले होते. दुपारी दोनच्या सुमारास ते परतल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी खडक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहायक पोलिस निरीक्षक कुदळे तपास करत आहेत. कोथरूड गावठाणातील तेजसगनगर परिसरात एका ज्येष्ठ नागरिकाच्या सदनिकेतून चोरट्यांनी कपाटातील एक लाख ६७ हजार ६०० रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केले. या घटनेची फिर्याद कोथरूड पोलिस ठाण्यात देण्यात आली असून, पोलिस उपनिरीक्षक चव्हाण तपास करत आहेत. तसेच, वारजे-एनडीए रस्त्यावरील शिवणे भागातही एका सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी ४८ हजार ८०८ रुपयांचे सोन्याचे दागिने चोरले. याप्रकरणी उत्तमनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असून, पोलिस उपनिरीक्षक चेतन धनवडे पुढील तपास करत आहेत. हडपसरमधील महंमदवाडी भागात एका घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी तीन लाख ८३ हजार रुपयांचे दागिने चोरले. या घटनेबाबत एका तरुणाने काळेपडळ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

## संक्षीप्त

### एटीएममधून पैसे काढणाऱ्या तरुणाला लुटले

पुण्यात गणेशखिंड रस्त्यावरील वीर चापेकर चौकात एटीएममधून पैसे काढून बाहेर पडलेल्या एका तरुणाला मारहाण करून २८ हजार रुपयांची रोकड लुटण्यात आली. ही घटना १ जानेवारी रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास घडली असून, याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दोन अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कसबा पेठेत राहणारा ३२ वर्षीय तक्रारदार तरुण आणि त्याचा मित्र श्री म्हसोबा मंदिराजवळील एटीएममधून पैसे काढून निघाले होते. त्याचवेळी दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी त्यांना अडवले. चोरट्यांनी शिवीगाळ करत मारहाण करण्यास सुरुवात केली. या झटापटीत तरुणाच्या खिशातील २८ हजार रुपयांची रोकड हिसकावून चोरटे पसार झाले. सहायक पोलीस निरीक्षक पांढरे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. शहरात पादचाऱ्यांना धमकावून त्यांच्याकडील रोकड, मोबाईल हिसकावून नेण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. तसेच, पादचारी महिलांकडून दागिने हिसकावण्याचे प्रकारही वाढले आहेत. यापूर्वी नगर रस्त्यावर बसची वाट पाहत थांबलेल्या एका तरुणाला पुणे स्टेशनपर्यंत सोडण्याची बतावणी करून मोटारचालक आणि त्याच्या साथीदारांनी लुटल्याची घटना नुकतीच घडली होती. दरम्यान, कर्वे रस्त्यावर पादचारी ज्येष्ठ महिलेचे मंगळसूत्र दुचाकीस्वार चोरट्यांनी हिसकावून नेल्याची आणखी एक घटना समोर आली आहे. या प्रकरणी अलंकार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अहिल्यानगरमधील लोणी प्रवरा गावचा रहिवासी असलेल्या तक्रारदार तरुणाच्या आईसोबत ही घटना घडली. १ जानेवारी रोजी ही महिला कर्वे रस्त्यावरून जात असताना, दुचाकीवरील चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील दोन लाख रुपये किमतीचे मंगळसूत्र हिसकावले आणि पळ काढला. पोलीस हवालदार सावंत या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# साईनगर वॉर्डात ओवरलोड रेती-गिट्टी टिपरांचा उच्छाद; प्रशासन निष्क्रिय, नागरिकांच्या जीविताशी थेट खेळ..!

### अरुंद रस्त्यांवर भरधाव अवजड वाहनांचा धुडगूस; विद्यार्थ्यांसह नागरिकांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका..!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : शहरातील साईनगर वॉर्डात रेती व गिट्टी वाहून नेणाऱ्या ओवरलोड टिपर वाहनांचा मोकाट सुळसुळाट दिवसेंदिवस वाढत असून, नियमांची सर्रास पायमल्ली होत असल्याचे भयावह चित्र समोर येत आहे. भरधाव वेगाने धावणारी ही अवजड वाहने म्हणजे जणू नागरिकांच्या जीवावर उठलेला मृत्यूचा सापळाच बनली असून, प्रशासन मात्र याकडे अक्षम्य दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

आज सायंकाळी सुमारे 4.00 ते 4.15 वाजताच्या सुमारास, कारमेल शाळेच्या मागील साईनगर मार्गावरुन रेतीने ओवरलोड केलेली टिपर वाहने अत्यंत वेगाने धावत असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले. विशेष म्हणजे हा मार्ग अतिशय अरुंद, सिंगल आणि वस्तीमधून जाणारा असून, याच रस्त्याचा वापर शाळकरी विद्यार्थी, लहान मुले, सायकलस्वार, महिला व पादचारी मोठ्या प्रमाणावर करतात. अशा ठिकाणी अवजड आणि ओवरलोड वाहनांची बेदरकार वाहतूक म्हणजे अपघाताला उघड आमंत्रण असल्याची तीव्र भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, रेती व गिट्टी वाहतुकीदरम्यान मंजूर रॉयल्टीपेक्षा कितीतरी पटीने अधिक साठा वाहून नेला जात आहे. इतकेच नव्हे तर, वाहतुकीदरम्यान रेती व गिट्टी रस्त्यावर सांडल्याने रस्त्यावर घसरण निर्माण होत असून, मागून येणाऱ्या दुचाकी व चारचाकी वाहनांसाठी ती मोठी धोक्याची बाब ठरत आहे. यामुळे कोणत्याही क्षणी गंभीर अपघात होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. "जर साईनगर वॉर्डात उद्या एखादी मोठी दुर्घटना घडली, तर त्याची जबाबदारी कोण घेणार?" असा थेट सवाल संतप्त नागरिकांनी उपस्थित केला आहे.

साईनगर परिसरातील रेती- गीट्टी ने भरलेल्या ओवरलोड टिप्पर वाहतूकिकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. साईनगर वॉर्डातील नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने ओवरलोड टिपर वाहनांवर कडक



कारवाई, वेगमर्यादेची काटेकोर अंमलबजावणी, रॉयल्टी तपासणी व वस्ती भागातून अवजड वाहनांच्या वाहतुकीवर निर्बंध घालण्याची जोरदार मागणी केली आहे. अन्यथा, नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा स्पष्ट इशाराही स्थानिकांनी दिला आहे.

# पंचायत समिती चामोर्शी येथील प्रशासकीय इमारत निर्लेखण करून नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम करण्यात यावे!

## डॉ. प्रणय खुणे प्रदेश अध्यक्ष राष्ट्रीय मानवाधिकार संघटना

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

चामोर्शी : गडचिरोली जिल्ह्यातील लोकसंख्येने सर्वात मोठा तालुका म्हणून ओळखले जात असलेल्या पंचायत समिती चामोर्शी येथील प्रशासकीय इमारत अतिशय जीर्ण, पूर्णपणे मोडकडीस आलेली आहे. सदर इमारत निर्लेखन करून त्या ठिकाणी नवीन पंचायत समिती प्रशासकीय इमारत बांधकाम करण्यात यावे अशी मागणी राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. प्रणय खुणे यांनी संघटनेच्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली. पंचायत समिती चामोर्शी हि गडचिरोली जिल्ह्यातील सर्वाधिक लोकसंख्येचा व सर्वाधिक ग्राम पंचायत असलेला तथा जिल्ह्यातील



मोठा व्यापारीपेठ तालुका आहे. अनेक वर्षापासून सदर प्रशासकीय इमारतीचे बांधकाम झाले आहे परंतू सदर इमारत आता मोडकडीस असलेली व अतिशय जीर्ण झालेल्या अवस्थ्येत आहे. पावसळ्यात त्या इमारती मधील स्लाप पाझर होऊन वरून पाणी खाली गळते. व खाली पाणी साचून राहते. पावसळ्यात बाहेरगाव येथून येणारे नागरिकांना तसेच कर्मचाऱ्याना पंचायत समिती कार्यालयीन कामकाजासाठी खूप त्रास सहन करावा लागतो.

त्याकरिता सदर पंचायत समिती इमारत निर्लेखन करून त्या ठिकाणी नवीन पंचायत समिती प्रशासकीय इमारत बांधकाम करण्यात यावे अशी मागणी राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. खुणे यांनी पंचायत समिती चामोर्शी येथे आपल्या अचानक भेटी दरम्यान केली. सदर मागणी संघटनेच्या निवेदनाद्वारे खासदार लोकसभा क्षेत्र चिमूर - गडचिरोली, आमदार गडचिरोली विधानसभा क्षेत्र, जिल्हाधिकारी गडचिरोली, मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प. गडचिरोली. यांना सुद्धा करण्यात आली आहे. यावेळी राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेचे अल्पसंख्याक आघाडी राष्ट्रीय उपाध्यक्ष जावेद भाई सय्यद, संघटनेचे जिल्हाध्यक्ष रमेश अधिकारी, माजी सरपंच रमेश लेकलवार, व मानवाधिकार संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी सरसावले केंद्रीय राखीव दल

### दुर्गम भागातील महिलांना सक्षम बनवण्यास कटिबद्ध

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

दिनांक - ०२/०२/२०२६ रोजी, दामरांचा, अहेरी, गडचिरोली (महाराष्ट्र) येथे, नक्षलग्रस्त ग्रामीण आदिवासी महिलांच्या उत्थानासाठी नागरी कृती कार्यक्रम २०२५-२०२६ अंतर्गत, केंद्रीय राखीव पोलिस दल (सीआरपीएफ)आणि महाराष्ट्र पोलिस, एसपीएस दामरांचा परिसर येथे, कमांडंट, ०९ बटालियन, केंद्रीय राखीव पोलिस दल, शंभू कुमार, ०९ बटालियन, सत्य नारायण मीना, ०९ सीआरपी, एसपीएस दामरांचाचे सहाय्यक कमांडंट आणि स्टेशन हाऊस ऑफिसर योगेश राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली, सर्व पोलिस दलाचे सदस्य आणि श्रीमती पुष्पा तलांडी, उपसरपंच, ग्रामपंचायत कुरुमपल्ली यांच्या उपस्थितीत, शिवणकाम प्रशिक्षणानंतर, सामुदायिक स्वयंपाकघरासाठी शिलाई मशीन, खुर्च्या, भांडी, कढई, लाडू, स्पॅटुला इत्यादींचे वितरण यशस्वीरित्या संपन्न झाले. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट महिलांना सक्षम करणे आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणे आहे. महिला सक्षमीकरण आणि उन्नतीचे काम केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या ९ व्या बटालियनकडून वारंवार केले जाते. येथील लोकांचे जीवन सोपे करण्यासाठी सीआरपीएफ वचनबद्ध आहे. या अगोदर शिंपी प्रशिक्षण सुरू झाले, ज्यामध्ये २० आदिवासी महिला सहभागी झाल्या. त्या दामरांचा, भांगरमपेटा, कोडसेपल्ली, नैनेर, चितवेली, कुरुमपल्ली आणि मांड्रा यासारख्या विविध गावांमधून आल्या होत्या. या महिलांना कापडाचे मापन, कटिंग, डिझाइनिंग आणि शिवणकाम



यासह विविध पैलूंमध्ये प्रशिक्षण देण्यात आले. मोफत शिंपीकाम, कटिंग आणि शिवणकाम प्रशिक्षण, उद्योजकता, आर्थिक व्यवस्थापन मार्गदर्शन आणि क्रेडिट सुविधा आणि बाजारपेठेतील संबंधांबद्दल सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. एसपीएस दामरांचा येथे झालेल्या समारोप समारंभात, प्रमुख पाहुणे, केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या ९ व्या बटालियनचे द्वितीय कमांडंट सत्य नारायण मीणा यांनी महिलांच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि महिला सक्षमीकरणासाठी काम करत राहण्यास प्रोत्साहित केले. शिलाई प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी झालेल्या महिलांना ०९ केंद्रीय राखीव पोलिस दलाचे द्वितीय कमांड श्री सत्य नारायण मीणा यांनी प्रमाणपत्रे आणि शिलाई मशीन प्रदान केले. नागरी कृती कार्यक्रम २०२५-२०२६ अंतर्गत, शिलाई प्रशिक्षण कार्यक्रम, शिलाई मशीन वाटप, खुर्च्या, भांडी, तवे, लाडू, स्पॅटुला इत्यादी सामुदायिक स्वयंपाकघरातील वस्तू यशस्वीरित्या संपन्न झाल्या.

# चाकूच्या धाकावर घरात जाऊन दागिने लुटणारे चोरटे अटकेत

### एकाला मध्यप्रदेशातून ठोकल्या बेड्या, दोघांना अटक

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

घरात घुसून महिलेला चाकूचा धाक दाखवत मोबाइल आणि सोन्याचे दागिने लुटणाऱ्या दोघांना चांदूर रेल्वे पोलिसांनी पकडले आहे. या प्रकरणात पोलिसांनी एका लूटारुला मध्य प्रदेशातून ताब्यात घेतले. त्यानंतर त्याच्या माहीतीवरुन त्याच्या दुसऱ्या साथीदारालाही अटक करण्यात आली आहे. रविवारी (दि. १) ही कारवाई करण्यात आली आहे. अनिलकुमार सुखराम उईके (२४, रा.नाहरबेली, जि.मांडला, मध्यप्रदेश) आणि देवेंद्र महेंद्र पवार (२०, रा. राजीव गांधीनगर, चांदूर रेल्वे) अशी अटक केलेल्या लूटारुंची नावे आहेत. २९ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्रीच्या सुमारास एका महिलेच्या घरात दोन अज्ञात व्यक्ती शिरले होते. त्यांनी चाकूचा धाक दाखवून महिलेकडील मोबाइल आणि २ ग्रॅमचे सोन्याचे कानातले जबरदस्तीने हिसकावून नेले होते. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. चांदूर रेल्वे पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला होता. तपासादरम्यान तांत्रिक माहितीच्या आधारे चोरी गेलेला मोबाइल मध्यप्रदेशातील मांडला जिल्ह्यात असल्याचे समोर आले होते. त्यावेळी चांदूरचे ठाणेदार अजय आकरे यांच्या मार्गदर्शनात पोलिसांचे एक पथक मध्य प्रदेशात रवाना झाले. पोलिसांनी अनिलकुमार उईकेला ३१ जानेवारी रोजी ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता, त्याने हा मोबाइल चांदूर रेल्वे येथील देवेंद्र महेंद्र पवार याच्याकडून घेतल्याची कबुली दिली. पोलिसांनी तातडीने देवेंद्र पवार यालाही ताब्यात घेतले आहे.



# शंभरावर उमेदवारांना नोटीस: निवडणूक खर्च सादर न केल्याने कारवाई

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

निवडणूक निकाल जाहीर झाल्यापासून एका महिन्याच्या आत निवडणूक खर्चाचा अहवाल सादर न केल्याने जिल्ह्यातील नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या शंभराहून अधिक उमेदवारांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली असून, संबंधित नगरपालिकांनी उमेदवारांना अहवाल सादर करण्यासाठी एक आठवड्याची मुदत दिली आहे. या नोटीसनंतरही उमेदवारांनी निवडणूक खर्चाचे अंतिम हिशेब सादर न केल्यास, तसा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवला जाईल. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत त्यांना पुन्हा नोटीस बजावण्यात येतील. जिल्ह्यातील १० नगरपालिका आणि दोन नगरपंचायतींच्या निवडणुकांचा निकाल गेल्या महिन्यात १६ डिसेंबर रोजी घोषित झाला होता. या तारखेपासून एका महिन्याच्या आत सर्व उमेदवारांना आपापल्या निवडणूक खर्चाचे



अंतिम हिशेब संबंधित तहसील कार्यालयातील निवडणूक विभागात सादर करणे बंधनकारक होते. मात्र, शंभराहून अधिक उमेदवारांनी अद्यापही ही प्रक्रिया पूर्ण केलेली नाही.

या निवडणुकीत अचलपूर, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, चिखलदरा, चांदूर बाजार, चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे, मोर्शी, वरुड आणि शेंदुरजनाघाट या १० नगरपालिका तसेच नांदगाव खंडेश्वर आणि धारणी या दोन नगरपंचायतींचा समावेश होता. यामध्ये एकूण १२ नगराध्यक्ष आणि २७८ नगरसेवक निवडून द्यायचे होते. नगराध्यक्षपदासाठी ६४, तर नगरसेवकपदासाठी १०४८ उमेदवार रिंगणात होते. यापैकी बहुसंख्य उमेदवारांनी आपला निवडणूक खर्च सादर केला आहे, परंतु शंभराहून अधिक उमेदवारांनी अद्यापही याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे संबंधित नगरपालिका प्रशासनाने त्यांना नोटीस बजावून एक आठवड्याची अंतिम मुदत दिली आहे. या मुदतीत खर्च सादर न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पुन्हा नोटीस पाठवण्यात येतील. नगरपालिका प्रशासन आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडून बजावण्यात आलेल्या नोटीसनुसार उमेदवारांनी कार्यवाही न केल्यास, त्यांची माहिती थेट राज्य निवडणूक आयोगाला कळवण्यात येईल. जिल्हाधिकारी संबंधित उमेदवारांवर कारवाईची शिफारस करतील. या शिफारशीनुसार, राज्य निवडणूक आयोग संबंधित उमेदवारांना पुढील ६ वर्षांसाठी कोणतीही निवडणूक लढवण्यास बंदी घालू शकते.

# सेमाडोह, बिच्छूखेडा, चुनखडी व आकी गावांच्या मूलभूत समस्यांवर तात्काळ कारवाईची मागणी

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : अक्षय अथोटे**

मेळघाट : सेमाडोह, बिच्छूखेडा, चुनखडी आणि आकी या गावांतील स्थानिक नागरिकांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मूलभूत समस्यांबाबत गंभीर दखल घेण्याची मागणी जोर धरू लागली आहे. या गावांतील नागरिकांनी माजी आमदार प्रभुदास भीलवेकर यांच्या नेतृत्वाखाली माननीय पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विशेष कार्य अधिकारी (ओएसडी) श्री. योगेश कोठेकर यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान माजी आमदार प्रभुदासजी भिलावेकर यांच्यासह मेळघाट परिसरातील अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांनी सविस्तर निवेदन सादर करून गावांमधील प्रमुख समस्या मांडल्या. यामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई, रस्त्यांची दयनीय अवस्था, वीज पुरवठ्यातील अनियमितता, शाळा-आरोग्य केंद्रांच्या अपुऱ्या सुविधा, सिंचन व्यवस्थेचा अभाव आणि इतर अनेक मूलभूत गरजा यांचा समावेश आहे. या समस्यांमुळे ग्रामीण भागातील जनजीवन अतिशय कठीण झाले असून, विकासाच्या मुख्य प्रवाहापासून या गावांचा दुरावा होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. श्री. योगेश कोठेकर यांनी निवेदन स्वीकारले असून, त्यांनी या समस्या गांभीर्याने पाहत असल्याचे सांगितले. तसेच संबंधित विभागांकडून या मुद्द्यांवर लवकरात लवकर कारवाई होईल, यासाठी आवश्यक पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. माजी आमदार प्रभुदास भिलावेकर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, "पालकमंत्री श्री. चंद्रशेखरजी बावनकुळे हे नेहमीच मेळघाट व सीमावर्ती भागाच्या विकासासाठी संवेदनशील राहिले आहेत. त्यांच्या ओएसडीमार्फत सादर केलेले निवेदन त्यांनी गांभीर्याने घ्यावे आणि तात्काळ संबंधित विभागांना – पाणीपुरवठा, सार्वजनिक बांधकाम, महावितरण, शिक्षण, आरोग्य आदी – आवश्यक कार्यवाहीचे ठोस आदेश द्यावेत, अशी आमची अपेक्षा आहे." स्थानिक नागरिकांनीही या भेटीला सकारात्मक प्रतिसाद देताना सांगितले की, "आमच्या गावांमध्ये



वर्षानुवर्षे मूलभूत सुविधा उपलब्ध होत नाहीत. आता तरी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी आमची एकच मागणी आहे." या निवेदनामुळे आता प्रशासनावर या गावांतील समस्यांवर त्वरित कारवाई करण्याचा दबाव वाढला आहे. पालकमंत्री श्री. बावनकुळे यांच्या निर्देशानुसार लवकरच या भागात विकासकामांना गती मिळेल, अशी स्थानिक नागरिकांमध्ये आशा आहे.

बुधवार, ४ फेब्रुवारी २०२६ | ६ | दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू | TODAY

गडचिरोली

GOOD MORNING

## पोर्ला येथे संत श्री जगदगुरु तुकाराम महाराज यांची जयंती साजरी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : गडचिरोली जिल्हा मुख्यालयापासून 15 किलोमीटर अंतरावर असलेल्या पोरला या गावांमध्ये संत श्री जगद्गुरु तुकाराम महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी पोर्ला कुणबी समाज संघटनेचे अध्यक्ष रविंद्रजी सेलोटे यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आला व पूजा अर्चा करण्यात आली. या जयंतीला पोर्ला गावचे प्रतिष्ठित नागरिक आणि गावातील कुणबी समाज बांधव खूप मोठ्या संख्येने उपस्थित होते. याच ठिकाणी जवळपास दहा वर्षापासून जगदगुरु संत श्री तुकाराम महाराज यांची जयंती व तुकाराम बीज खूप मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येते. या कार्यक्रमाचे संचालन पोर्ला गावचे प्रतिष्ठित नागरिक सुधीर चुधरी यांनी केले.



## संक्षीप्त



### मौशिखांब येथे संत शिरोमणी नरहरी महाराज पुण्यतिथी उत्सव भव्य; २७ वर्षांची उज्ज्वल परंपरा कायम

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : मंगेश सहारे

मौशिखांब येथील संत शिरोमणी नरहरी महाराज मंदिरात पुण्यतिथी उत्सव अत्यंत भक्तिभावात व उत्साहात साजरा होत असून या धार्मिक परंपरेला यंदा २७ वर्षे पूर्ण झाली आहेत. मौशिखांब येथील सोनार समाजाच्या वतीने दरवर्षी श्रद्धेने साजरा होणारा हा उत्सव परिसरातील भाविकांसाठी आस्थेचा केंद्रबिंदू ठरत आहे. या पुण्यतिथी उत्सवाची सुरुवात ३ तारखेला घटस्थापनेने करण्यात आली. घटस्थापनेपासून मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. उत्सवाच्या मुख्य दिवशी ४ तारखेला गोपाळकाला व कीर्तनाचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून हा कार्यक्रम मा. डोमळे महाराज, आकापूर यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. कीर्तनातून संत शिरोमणी नरहरी महाराजांच्या जीवनकार्याचा, साधेपणाचा व समाजप्रबोधनाचा संदेश दिला जाणार आहे. या निमित्ताने गोपाळकाला व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार असून सोनार समाज बांधवांसह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. संत परंपरेचा जागर करणारा हा उत्सव मौशिखांब गावाच्या सामाजिक व धार्मिक एकतेचे प्रतीक ठरत आहे.



### कुरखेडा येथे होणार पत्रकार भवनाची सूसज्ज इमारत

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

कुरखेडा : शहरात नगरपंचायत स्थानिक विकास निधी अंतर्गत तहसील कार्यालय समोर पत्रकार भवनाचा नियोजित जागेवर सूसज्ज समाज भवन बांधकामाला मान्यता मिळाली आहे सदर बांधकामाचे आज नगरपंचायत पदाधिकार्यांचा हस्ते भूमिपूजन संपन्न झाले. शहरात पत्रकारांचा विविध कार्यक्रमाकरीता जागा नियोजित करण्यात आली होती, मात्र हक्काची इमारत नसल्याने अडचण होत होती. या संदर्भात स्थानिक पत्रकार संघटनेचा वतीने नगरपंचायत अध्यक्ष, उपाध्यक्ष व पदाधिकारी यांच्याकडे तगादा लावण्यात आला होता. अखेर या मागणीला यश येत नगरपंचायत नियोजित जागेवर समाज भवन बांधकामाला मंजुरी प्रदान करीत बांधकामाला प्रत्येक्ष सूरवात करण्यात आल्याने पत्रकारांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. भुमिपूजन प्रसंगी नगराध्यक्ष अनिताताई बोरकर, उपाध्यक्ष बबलूभाई हूसैनी, पाणीपुरवठा सभापती आशीष काळे, महिला व बालकल्याण सभापती प्राचीताई धोंडणे, माजी नगराध्यक्ष रवींद्र गोटेफोडे, नगरसेवक जयेंद्रसिंह चंदेल, नगरसेवक सभापती अतूल झोळे, नगरसेविका दूर्गाताई गोटेफोडे, आशाताई तूलावी, हेमलता नंदेश्वर, कूंदाताई तितिरमारे, जयश्रीताई रासेकर, कांताबाई मठ्ठे, तालुका पत्रकार संघटनेचे अध्यक्ष नासीर हाशमी, माजी अध्यक्ष सिराज पठान, विजय भैसारे, कोषाध्यक्ष विनोद नागपूरकर, चेतन गहाणे, ताहिर शेख, कंत्राटदार न्याज सय्यद, अभियंता खापरे तसेच नगरपंचायत कर्मचारी व नागरिक हजर होते.




### १३ व्या दीक्षांत समारंभ गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली तर्फे आचार्य तुळशीराम टी. कांबडे यांना पी. एच. डी. पदवी बहाल

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

अहेरी : मराठी विषयातील यशवंत मनोहराची कविता एक चिकित्सक अभ्यास या विषयात १३ व्या दिक्षात समारंभात गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली कडून प्रा. तुळशीराम शंकर कांबळे यांना आचार्य पी. एच. डी. पदवी बहाल करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ. प्रशांत बोकारे कुलगुरू गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, प्रमुख अतिथी मा. डॉ.अभय बंग सर्च शोध ग्राम व्यसनमुक्ती तथा पदमश्री महाराष्ट्र भूषण गेट्स चॅम्पियन अवार्ड प्राप्त, प्रा. टी. एस. कांबळे उच्च माध्यमिक शिक्षक या पदावर शासकीय माध्यम व उच्च माध्यमिक आश्रम शाळा बामणी येथे सध्या कार्यरत असून अहेरी तालुक्यातील इंदाराम जवळ मोदूमतुर्रा येथील अत्यन्त गरिबीतून निघालेला ३ भावंडे आणि १ बहीण, आई, वडील असा एक कुटुंब होता त्यात मी सर्वात धाकटा भाऊ असल्याने आणि आई वडील म्हातारे असल्यामुळे सर्व कुटूंबाची जबाबदारी माझ्याच अंगावर होती. घरची जबाबदारी पार पाडत मी आधीच अभ्यासाकडे दुर्लक्ष केलेला नाही. एक शेतकरी कुटुंबातील हलाकीची परिस्थितीतून आता परिश्रम संघर्ष संयम आणि स्वप्रपुरतीचा अनोखा प्रवास २००० - २००१ ला थायलंड येथे झालेल्या थायलंड Thai india फ्रेंडशिप कप आंतरराष्ट्रीय खराटे स्पर्धा रोप्या पथक प्राप्त केले. या phd पदवीचा मला वेळोवेळी मार्गदर्शन करणारे मार्गदर्शक गोडवाना विद्यापीठाचे शैक्षणिक संशोधनातून मिळालेले ज्ञान समाजासाठी साहित्याचा प्रगल्भतेसाठी आणि विज्ञान निर्मितीसाठी कार्य करणे हीच या पदवीची खरी सार्थकता आहे.

# जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अजय कंकडालवार यांच्या अवैद्य बांधकाम झालेल्या चार मजली बिल्डिंगवर बुलडोजर

## अहेरी नगरपंचायतची धडक कारवाई

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

अहेरी : अहेरी शहरात नियमांना केराची टोपली दाखवत उभी राहिलेली आणि दीर्घकाळ चर्चेत असलेली माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अजय कंकडालवार यांची वादग्रस्त पाच मजली इमारत अखेर अहेरी नगरपंचायतीने आज सकाळपासून बुलडोझरच्या साहाय्याने पाडण्यास सुरुवात केली. न्यायालयीन प्रक्रियेनंतर मिळालेली मुदत संपताच, कोणतीही स्थगिती न मिळाल्याने प्रशासनाने मोठ्या पोलीस बंदोबस्तात ही ठोस आणि धडक कारवाई केली. गडअहेरी मार्गालगत कंकडालवार यांनी खरेदी केलेल्या भूखंडावर इमारत उभारण्यासाठी नगरपंचायतीकडे परवानगी मागितली होती. मात्र राज्य महामार्गाच्या नियमानुसार आवश्यक असलेले २० मीटर अंतर किंवा रस्त्याच्या हद्दीपासून ४.५० मीटर अंतर सोडण्यास त्यांनी नकार दिला. स्पष्ट नियमांचे उल्लंघन होत असल्याने नगरपंचायतीने सुरुवातीलाच बांधकामाचा नकाशा नाकारला. तरीही परवानगीशिवाय बांधकाम सुरूच ठेवण्यात आल्याने हे प्रकरण न्यायप्रविष्ट झाले. दरम्यान, विधानसभा निवडणुकीतील बंडखोरी आणि स्थानिक पातळीवरील राजकीय नाराजीमुळे या प्रकरणाला राजकीय वळण मिळाले. विरोधकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा केल्याने प्रशासनानेही या प्रकरणात गांभीर्याने दखल घेतली. नगरपंचायतीने अनधिकृत बांधकाम पाडण्याचे आदेश दिल्यानंतर कंकडालवार यांनी न्यायालयात धाव घेतली होती. मात्र २९ नोव्हेंबर २०२५ रोजी न्यायालयाने त्यांच्या विरोधात निकाल देत नगरपंचायतीच्या कारवाईला वैध ठरवले. यानंतर वरिष्ठ न्यायालयात अपील करण्यासाठी देण्यात आलेली मुदतही संपली. कोणतीही स्थगिती न मिळाल्याने अखेर आज नगरपंचायतीने थेट बुलडोझर चालवत कारवाई सुरू केली. या आधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्ते नियमावलीबाबत स्पष्ट माहिती घेण्यात आली होती. वारंवार नोटिसा बजावून आणि पोलीस तक्रार करूनही बांधकाम थांबवले गेले नसल्याने प्रशासनाला ही टोकाची कारवाई करावी लागल्याचे सूत्रांनी स्पष्ट केले. कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी अहेरी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. सकाळपासून परिसरात तणावपूर्ण शांतता असून नागरिकांची मोठी गर्दी कारवाई पाहण्यासाठी जमली होती. "नियम मोडणाऱ्यांना राजकीय पाठबळ असले तरी कारवाई अटळ आहे. अहेरी नगरपंचायत हद्दीतील कोणत्याही अनधिकृत बांधकामावर अशीच कठोर कारवाई केली जाईल," असा स्पष्ट संदेश या कारवाईतून नगरपंचायत प्रशासनाने दिला आहे. ही कारवाई म्हणजे अहेरीत 'कायदा सर्वांसाठी समान' असल्याचा ठाम इशारा मानला जात असून, पुढील काळात इतर अनधिकृत बांधकामांवरही बुलडोझर चालण्याची शक्यता वर्तवली जात आहे.




# एटापल्ली पोलिसांची धडक कारवाई; बेकायदेशीर सुगंधित तंबाखू जप्त..!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

एटापल्ली : एटापल्ली शहरात बेकायदेशीर सुगंधित तंबाखू विक्री करणाऱ्या तस्करांविरोधात पोलिसांनी मोठी आणि धडक कारवाई करत तस्करीचे जाळे उघडकीस आणले आहे. दिनांक ०३ फेब्रुवारी २०२६ रोजी एटापल्ली पोलिसांनी अंडा चौक परिसरात सापळा रचून सुमारे २५ हजार रुपये किमतीचा 'मजा' ब्रँडचा सुगंधित तंबाखू जप्त केला. या कारवाईमुळे परिसरात अवैध तंबाखू विक्री करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

छत्तीसगड राज्यातुन एटापल्लीकडे मोठ्या प्रमाणात बेकायदेशीररीत्या सुगंधित तंबाखू आणला जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करून अंडा चौक परिसरात सापळा रचण्यात आला. संशयित मोटारसायकल क्रमांक CG 19 T 8317 दिसताच पोलिसांनी पाठलाग सुरू केला. काही अंतरावर वाहन अडवून तपासणी केली असता मोटारसायकलवरून मोठ्या प्रमाणात सुगंधित तंबाखू वाहतूक होत असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी रमेश हिरा व देवव्रत सिकदर या दोघांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून सुमारे २५ हजार रुपये किमतीचा सुगंधित तंबाखू व वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे.



प्राथमिक चौकशीत हा तंबाखू एटापल्लीतील एका व्यापाऱ्याला पुरवठा करण्यासाठी आणला जात असल्याची माहिती समोर आल्याने या प्रकरणाला गंभीर वळण लागले आहे. संबंधित व्यापारी कोण आहे, याबाबत सध्या शहरात चर्चा सुरू असून पोलिसांकडून याची सखोल चौकशी केली जात आहे. सदर कारवाईदरम्यान पोलीस कर्मचारी चंद्रशेखर शेकुर्तिवार यांनी महत्त्वाची भूमिका बजावत पाठलाग करून मुद्देमाल व वाहन जप्त करण्यात यश मिळवले. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मोतीराम जी. मडावी करीत असून, तस्करीमागे नेमके कोणते जाळे कार्यरत आहे, याचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

एटापल्ली परिसरात अल्पवयीन व तरुणांमध्ये व्यसन वाढीस कारणीभूत ठरणाऱ्या सुगंधित तंबाखूविरोधात पोलिसांनी उचललेले हे पाऊल स्वागतार्ह मानले जात असून, येत्या काळात आणखी कारवाया होण्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त करण्यात आली आहे. या धडक कारवाईमुळे तंबाखू तस्करांच्या गोटात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पुढे आणखी धक्कादायक नावे उघड होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# 'राज्य आरोग्य धोरण आणि तांत्रिक सल्लागार समिती' गठीत

### सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञ डॉ. अभय बंग (SEARCH, गडचिरोली) व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रताप शिंदे यांचा समावेश

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी फुलचंद वाघाडे

मुंबई : महाराष्ट्र शासनाने राज्याचे आरोग्य धोरण अधिक सक्षम आणि आधुनिक करण्यासाठी 'राज्य आरोग्य धोरण आणि तांत्रिक सल्लागार समिती' (SHPTAC) या समितीवर विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांची सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत आज यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. "उद्देश आणि पार्श्वभूमी" केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि राज्याच्या स्थानिक गरजा लक्षात घेऊन पुराव्यावर आधारित आरोग्य धोरणे तयार करणे, हा या समितीचा मुख्य उद्देश आहे. आरोग्य क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान, नवकल्पना आणि विविध उपक्रमांबाबत शासनाला तांत्रिक सल्ला देण्यासाठी ही समिती कार्यरत राहील. समितीचे स्वरूप आणि प्रमुख सदस्य या समितीमध्ये शासकीय आणि खाजगी क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे. समितीचा कार्यकाळ एक वर्षाचा असेल. - प्रमुख नियुक्त्या खालीलप्रमाणे आहेत- जिल्हा प्रशासन: डॉ. मिताली शेट्टी (जिल्हाधिकारी, नंदूरबार), श्रीमती के. मंजुलक्ष्मी (आयुक्त, कोल्हापूर मनपा) आणि श्रीमती मीनल करनवाल (CEO, जळगाव जिल्हा परिषद). जिल्हा आरोग्य प्रशासन: डॉ. एन. बी. राठोड (जिल्हा शल्य चिकित्सक, नागपूर) आणि डॉ. प्रताप शिंदे (जिल्हा आरोग्य अधिकारी, गडचिरोली). सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञ: डॉ. अभय बंग (SEARCH, गडचिरोली), डॉ. माधुरी कानिटकर (माजी कुलगुरू, MUHS) आणि डॉ. मिताली सचदेव (संचालक, NIRRH). सामाजिक संघटना: डॉ. आशिष सातव (MAHAN Trust, मेळघाट) आणि डॉ. अभय शुक्ला (SATHI CEHAT). इतर तज्ज्ञ: आरोग्य तंत्रज्ञान विभागात डॉ. रागिणी कुलकर्णी (शास्त्रज्ञ, ICMR) आणि राज्य आरोग्य संसाधन केंद्र प्रतिनिधी म्हणून डॉ. सुभाष साळुंके यांची निवड करण्यात आली आहे. वैद्यकीय शिक्षण: मुंबई, पुणे, सातारा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील वरिष्ठ प्राध्यापकांचीही सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय, समितीमध्ये शुश्रूषा संवर्ग (Nursing) आणि संलग्न आरोग्य व्यावसायिकांच्या (Allied Health Professionals) प्रतिनिधींनाही स्थान देण्यात आले आहे. "धोरणात्मक महत्त्व"-- आरोग्य क्षेत्रातील वाढत्या गरजा आणि तांत्रिक बदल लक्षात घेता, विविध भागधारकांकडून (Stakeholders) तज्ज्ञ माहिती मिळवणे शासनासाठी आवश्यक होते. ही समिती आता राज्याच्या सार्वजनिक आरोग्य धोरणाला दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण काम करेल.

# पिस्तुलातून गोळी झाडून खुनाचा प्रयत्न; 9 जणांविरुद्ध गुन्हा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

पुणे : आर्थिक वादातून एका तरुणाला विवस्त्र करून बेदम मारहाण करण्यात आली. आरोपींनी त्याच्यावर पिस्तुलातून गोळीबार करत खुनाचा प्रयत्न केला. ही घटना पुण्यातील कात्रज-कोंढवा रस्त्यावर घडली असून, याप्रकरणी नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरार आरोपींचा शोध सुरू आहे.पोलिसांनी संबंधित परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणी सुरू केली आहे. याप्रकरणी एका ३१ वर्षीय तरुणाने येवलेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार वाहन खरेदी-विक्रीचा व्यवसाय करतो आणि कोंढवा परिसरात राहतो. आरोपी त्याच्या ओळखीचे आहेत. आयुष कामठे, अभि म्हस्के, अभि पाटील, मंगेश माने, कौशल उर्फ ऋषी मोरे यांच्यासह नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी तरुणाला मारहाण करून त्याचे मोटारीतून अपहरण केले. रात्री अकराच्या सुमारास त्याला कात्रज-कोंढवा रस्त्यावरील गोकुळनगर परिसरातील मोकळ्या मैदानात नेण्यात आले. मैदानात तरुणाला विवस्त्र करून बेदम मारहाण करण्यात आली.



# प्रशासनावर दबाव टाकून ज्येष्ठ पत्रकारच करतो रेतीची तस्करी

## एटापल्ली तालुक्यातील आलदंडी नदी घाटावरून रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेत अवैद्य रेतीची चोरी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

एटापल्ली : एटापल्ली तालुक्यातील आलदंडी येथील बांदे नदी घाटावरून रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेत अवैद्य रेतीची चोरी केली जात आहे. शिक्षकी पेशेतून पत्रकारितेकडे वळलेले ज्येष्ठ पत्रकारच रेतीची तस्करी करत असल्याचे परिसरात चर्चा केली जात आहे. महसूल विभाग व वनविभाग या दोन्ही प्रकारच्या शासन-प्रशासनाला न जुनामता व शासन - प्रशासनावर दबाव टाकून एटापल्ली तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकारच रेतीची तस्करी करत असेल तर शासनाला व प्रशासनाला होणाऱ्या नुकसानीची भरपाई कोण करणार व कुठून होणार ? बाकींच्या रेती तस्करांच्या बातम्या प्रसिद्ध कोण करणार? अशी कुजबुज सुरु झाली आहे. आलदंडी येथील बांदे नदी घाटावरून रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेत जेष्ठ पत्रकार मुजोरीने, धमकावत, प्रशासनावर दबाव टाकून, सर्रास रेती तस्करी करत असल्याचे परिसरात बोलल्या जात आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची चौकशी करून सदर व्यक्तीवर गुन्हे दाखल करून कारवाई करा अशी मागणी परिसरात जोर धरू लागली आहे.

### "पहिले होते शिक्षकी पेशात आता झाले जेष्ठ पत्रकार"

■ एटापल्ली तालुक्यातील आलदंडी येथील बांदे नदी घाटावरून खुलेआम रेतीची तस्करी होत असताना महसूल विभाग व वन विभागातील शासन- प्रशासनाचे अधिकारी मात्र झोपेचे सोंग घेऊन ज्येष्ठ पत्रकाराला खुली मुभा दिली आहे का ? असा प्रश्न सदर परिसरातील जनता जनार्दन शासन प्रशासनाला विचारत आहे. की सदर जेष्ठ पत्रकाराला शासन आणि प्रशासन सहकार्य करत आहे हेच कळेनासे झाले असून अशा अवैध धंद्यांना ज्येष्ठ पत्रकाराकडूनच नदी मधून रेती तस्करीची मुभा असेल तर करायचं काय? आणि जर दुसऱ्यांनी चोरी केलेली अवैद्य रेती पेपरला छापायचे तर कसे असाही प्रश्न ज्येष्ठ पत्रकार यांना उपस्थित होत असल्याचे दिसून येत आहे. याचाच अर्थ असा होतो आहे की, एटापल्ली तालुक्यातील सदर अवैद्य रेती तस्करांवर या ज्येष्ठ पत्रकारांचा आशीर्वाद असावा. असेही म्हटले तरी वावडे ठरणार नाही.

